# बौद्ध पूजा पाठ

संकलन : राजरत्न ठोसर

-----------------------------------

**विनिमय पब्लिकेशन्स**

**website : vinimaypublications.com**

“हे तथागता जोपर्यंत मला संबोधी प्राप्त होत नाही, तोपर्यंत मी पवित्र शिलांचा भंग करणार नाही. मी माझ्या वडिलधाऱ्यांशी उद्धटपणे वागणार नाही. मी सदैव माझ्या हृदयात मैत्री विकसीत करीन व इतरांसाठी एक आदर्श उदाहरण बनेन.”



# प्रस्तावना

बौद्ध पूजा पाठ हे पुस्तक नक्कीच बौद्धांना प्रेरणादायी ठरेल. बुद्धवंदनेवर आजवर खूप पुस्तके निघालीत. पण या पुस्तकात मात्र वाचकांना वेगळेपण असणारी माहिती मिळेल. भगवान बुद्धांची बत्तीस लक्षणे, महाराष्ट्रातील बौद्ध लेण्या, बौद्ध धम्म असलेली जगातील काही राष्ट्रे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुद्ध आणि त्यांच्या धम्माबद्दल जगातील काही मान्यवरांचे गौरोद्गार तसेच प्रत्येक गाथेचा मराठी अर्थही दिलेला आहे.

बाबासाहेबांनी आपल्याला दिक्षा दिलेली आज पन्नास वर्षे होऊन गेली आहेत. पन्नास वर्षापूर्वीची स्थिती पाहता आपल्याकडे काय होते आणि आज काय नाही. कोणत्या चैनीच्या वस्तू आपणाकडे नाहीत. बाबासाहेबांनी आपल्यासाठी काय काय केले याची तर गणतीच करता येणार नाही. आईची पित्याची माया दिली. अन्न, वस्त्र निवाऱ्यापासून सर्व काही उपभोगाच्या वस्तू ही सर्व बाबासाहेबांची देण आहे. सन्मानाचं जीवन त्यांनी दिलं.

दिक्षाभूमीवर बाबासाहेबांनी ५ लाख हिंदूंना म्हणजेच महार म्हणून वाळीत टाकलेल्या लोकांना बौद्ध धम्माची दिक्षा दिली. त्यानंतर त्यांचे ६ डिसेंबरला निर्वाण झाले. त्यांच्या राहिलेल्या (तसे पाहता त्यांनी कोणतेच काम दुसऱ्यासाठी ठेवले नाही त्यांनी स्वतः पूर्ण केले) कार्याची जबाबादारी आपणावर येऊन पडली आणि ती आपण किती प्रमाणात पूर्ण केला? लोक म्हणतात आंबेडकरी चळवळ संपलेली आहे किंवा संपत आहे त्याला जबाबदार कोण तेच लोक आहेत ना? की आणखी कोणी?

आज सफेद कपडे घालून लोक स्वतः ला बौद्धाचार्य म्हणवून घेतात. मात्र त्यांचे आचरण बौद्धाचार्यासारखे असते का? (अपवाद) मुळीच नाही? सत्यनारायणाच्या धर्तीवर ते परित्राण पाठाचे समारंभ करू लागले आहेत. लग्नविधी, अस्थीविसर्जन करतात आणि खूप मोठा डोंगर पालथा घातल्यासारखे भटासारखे दक्षिणा घ्यायला हात पुढे करतात. दारू पितात, पंचशिल पाळत नाहीत, २२ प्रतिज्ञा पण नाही आणि स्वतः ला श्रेष्ठ विद्वानासारखे समजून मोठमोठ्याने प्रवचने देतात. हिंदूंचे सण साजरी करतात. दिवाळी, दसरा (विजयादशमी नव्हे) गुढीपाडवा, होळी, रंगपंचमी, गोपाळकाला, गणेश चतुर्थी, नवरात्री साजरी करतात. सणावारीला लोकांना सांगतात हा आपला सण नाही आणि स्वतः मात्र बायका मुलांना घेऊन कपडे खरेदी करायला जातात. घरात बाहेर बुद्धाचा व बाबासाहेबांचा

फोटो लावतात आणि किचनमध्ये देवांचे फोटो लावतात. लोकांना सांगतात धम्माचं पवित्र ज्ञान आणि त्याचं मात्र कोरडं पाषाण. काय असे प्रसारक, बौद्धाचार्य बाबासाहेबांना हवे होते ? याचा वाचकांनी विचार केला पाहिजे.

हे पुस्तक वाचल्यावर काही लोक म्हणतील या दीडशहाण्याने बौद्धाचार्यांवर टीका केली आहे. पण ही टीका नाही तर निर्वीवाद सत्य आहे; पाहिजे तर संशोधन करून पहा. मी काय सर्वच बौद्धाचार्यांवर टीका केलेली नाही. जे वाईट वर्तन करतात त्यांच्यावर सत्य लेखन केले आहे. मात्र वेगळे असे मी काही लिहिले नाही.

## पूजास्थान कशासाठी?

पूजा-प्रार्थनेस बौद्ध धम्मात काय स्थान आहे ? या प्रश्नाने अनेकांच्या मनाचा मोठा गोंधळ उडवून टाकला आहे. काहींना श्रद्धा आणि अंधश्रद्धेतील फरकच कळून येत नाही. याचे कारण एकच आहे, ते म्हणजे ईश्वरप्रधान धर्मात ईश्वराला संतुष्ट ठेवण्यासाठी, त्याच्या कोपापासून वाचण्यासाठी, त्याला पूजा-प्रार्थनेने प्रसन्न करून मनोवांच्छित काही मागण्यासाठी पूजा केली जाते, असा विचार केल्यामुळेच होय. पण बौद्ध धम्मात या कारणांसाठी पूजा मुळीच केली जात नाही आणि प्रार्थनेला तर तेथे वाव नाही, मग बौद्धांची ही पूजा कसली ? शेवटी एकच असा प्रश्न उरतो.

तर येथे पूजा या समान शब्दप्रयोगाने फार मोठा घोटाळा होतो. पूजेतही दोन प्रकार आहेत- एक पूर्णपणे अंधश्रद्धा असलेली व दुसरी केवळ आदर्श म्हणून केली जाणारी. आपण ईश्वरप्रधान धर्मातून धर्मांतर करुन बौद्ध बनलेलो असतो आणि पूर्वीचे नकळतपणे आपणावर घडलेले संस्कार अगदी खोलवर रूजलेले असतात. म्हणून आपण जरी ईश्वरप्रधान धर्म सोडला तरी बुद्धपूजेबद्दल विचार करताना आपण या शब्दाचा जुनाच, बौद्धेतरांचा अर्थ मनी बाळगीत असतो. ते आपण सर्वप्रथम सोडून दिले पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे बुद्ध हे एक मानव होते. परंतु ते काही सर्वसामान्य मानव नव्हते, तर ते एक सम्यक सम्बुद्ध सर्वज्ञानी असे प्रबुद्ध मानव होते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. परिपूर्ण प्रज्ञा, अपार मैत्री आणि करूणाा व विपुल वीर्य यांचे मुर्तीमंत प्रतीक होते आणि बौद्ध धम्मानुसार अशा प्रबुद्ध मानवाचे अस्तित्व हे विश्वातील सर्वश्रेष्ठ अस्तित्व मानले जाते. अगदी तथाकथित ईश्वरापेक्षाही सर्वश्रेष्ठ मानले

जाते. म्हणूनच अशा प्रबुद्ध मानवाची एक आदर्श म्हणून पूजा केली जाते. त्यांनी आपल्यापुढे बुद्धत्वाचा आदर्श स्वप्रयत्नांतून निर्माण करून ठेवल्याबद्दल आणि आपण एक मानव म्हणून काय बनू शकतो व कसे बनू शकतो याचा मार्ग दाखवून दिल्याबद्दल बुद्धांची कृतज्ञेच्या भावनेतून पूजा केली जाते. त्यांनी 'अत्त दीप भव' बनण्याचा सर्वांना मार्ग दाखवून दिला. म्हणून त्यांची देव म्हणून नव्हे तर एक गुरू, आदर्श, मार्गदाता म्हणून गौरवार्थ पूजा केली जाते. म्हणून ही पूजा आंधळेपणाने केली जाणारी ईश्वरपूजा ठरत नाही.

'पूजाच पूजनीयानं एतं मंगलमुत्तमं'असे भगवान बुद्धांनी मंगलसुत्तात म्हटले आहे- याचा अर्थ काय? तर आदरभाव व्यक्त करण्यायोग्य किंवा वंदन करण्यायोग्य अशी ज्यांच्यापाशी पात्रता आहे, त्यांचा तसा आदर करणे होय. आदरभाव जेव्हा अतिगंभीर असतो तेव्हा त्याला पूज्य म्हणतात. पूजा ही आदर्शांचीच केली जाते. नतमस्तक झाल्याने त्या आदर्शाचा प्रभाव ग्रहण करण्याची शक्ती अंगी येते, समजता येते. त्याप्रमाणे आपले जीवन घटविण्याची प्रेरणा लाभते. म्हणून विनम्र होणे या अर्थी पूजा समजली जाते. अशी पूजा ईश्वरप्रधान धर्मातील पूजेसारखी असत नाही. ईश्वरावर पूर्णपणे अवलंबून राहणे, त्याच्या कोपाला भिऊन त्यापासून वाचण्यासाठी पूजा करणे, ही पूजा ग्रहणशीलता वाढवून ज्ञानार्जनाची आणि त्यायोगे आपले जीवन घडविण्याची प्रेरणा देणारी असत नाही. तर भय, लोभ आणि अज्ञानापोटी घडणारी पूजा असते. बुद्धपूजा आणि ईश्वरपूजा यात जमीन अस्मानचा फरक आहे. ईश्वरपूजेमुळे माणसाचा प्रत्यक्षात काही लाभ होत नसतो. म्हणून बौद्ध पूजा इतर पूजांपेक्षा वेगळी होय. भय व लोभासाठी ही पूजा असत नाही. त्यामुळे माणसाचा प्रत्यक्षात काही लाभ वा नुकसान होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. येथे तुम्ही बुद्धाकडे काही मागत नसता व भितही नसता आणि म्हणूनच त्यांना खूष ठेवण्याचा प्रयत्नही करीत नसता.

शिवाय एक मानव म्हणून आपणामध्ये व बुद्धामध्ये जे साम्य आहे ते लक्षात घेता, बुद्ध म्हणजे आपलेच एक पूर्ण विकसित रूप होय. त्यामुळे बुद्धांच्या आदर्शाची सार्थता पटून आपल्या मनात त्याबद्दल आदराची व प्रतिसादाची भावना निर्माण होते. या भावनेस श्रद्धा असे म्हणतात. पण ही आंधळी श्रद्धा असत नाही. ही श्रद्धा कृतीमधून व्यक्त करण्यासाठी आपण अभिवादन, पूजा, वंदन करीत असतो. ही श्रद्धा शारिरीक दृष्ट्या व्यक्त करताना आपण नमस्कार किंवा पंचांग प्रणाम करतो. ही श्रद्धा वाचेद्वारा व्यक्त करताना आपण त्या आदर्शाचा गुणगौरव करतो, पूजा वंदन म्हणतो, सुत्त पठण करतो आणि हीच श्रद्धा मनाने व्यक्त करण्यासाठी आपण ध्यान करतो. म्हणून अशा प्रकारची पूजा नेहमीच्या ईश्वरासाठी केलेल्या पूजेसारखी असू शकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे पूजेचा संबंध माणसाच्या डोक्यापेक्षा हृदयाशी, त्याच्या भावनांशी अधिक असतो. शुद्ध, विधायक आणि ग्रहणशील भाव निर्मीतीसाठी पूजा ही पहिली पायरी होय. ते श्रद्धेचे एक अंग होय आणि श्रद्धा जशी डोळस

आणि आंधळी असू शकते तसेच पूजेचे सुद्धा होय. पंचज्ञानेंद्रियांमधील पहिले ज्ञानेंद्रिय 'श्रद्धा' होय. त्याच्या विकासाचा संबंध येतो तो पूजेशी आणि अशा डोळस पूजेमुळे बुद्धत्वाच्या आदर्शावरील श्रद्धा बळकट होते आणि तो आदर्श आपल्या जीवनात उतरविण्याची प्रेरणा मिळते. विनम्रतेशिवाय श्रद्धा नाही आणि बुद्धत्वाकडे वाटचाल होणे शक्य नाही.

पूजा करताना बुद्धमुर्तीसमोर पुष्प, दीप आणि सुगंध अर्पण करण्याची बौद्धांची प्राचीन काळापासून चालत आलेली परंपरा आहे. येथे पष्प किंवा फूल हे अनित्येच्या शिकवणीचे प्रतीक आहे. आपले शरीर व इतर भौतिक गोष्टी फूलासारख्याच असतात. आज हसरी, टवटवीत, सुवासिक तर उद्या कोमेजलेली, निस्तेज आणि दुर्गंधी सुटलेली; म्हणून भौतिक आसक्ती ठेवू नये. दीप हे बुद्धाच्या प्रज्ञेचे प्रतीक आहे. बुद्धांनी आपल्या प्रज्ञारूपी दिपाने अंधकाराचा नाश केला. त्याचप्रमाणे आपण त्या प्रज्वलित बुद्धप्रदिपापासून आपला प्रज्ञारुपी दीप प्रज्वलित केला पाहिजे. तिसरे प्रतिक सुगंध (अगरबत्ती). हे आहे शीलमय जीवनाचे प्रतीक! ज्याप्रमाणे सुगंध सर्व दिशांना पसरतो, त्याचप्रमाणे आपल्या शुद्ध व शीलवान जीवनाच्या सुगंधाचे होय. सुगंधी द्रव्यांचा सुगंध केवळ वाऱ्याबरोबरच पसरतो, पण शीलवान शुद्ध जिवनाचा सुगंध मात्र वाऱ्याच्या विरूद्ध दिशेलासुद्धा पसरतो. हा या प्रतिकांचा भावार्थ होय. म्हणून भगवान बुद्धांच्या पूजेत दीप (मेणबत्ती), पुष्प आणि सुगंध (अगरबत्ती) यांना स्थान आहे.

म्हणून पूजा वंदना करण्यामधून बुद्धत्वाच्या आदर्शावरील आपली श्रद्धा बळकट होण्यास सहाय्य होते आणि उचित प्रकारे धम्माचरण करण्याची आपणास सदैव प्रेरणा मिळत राहते. म्हणून पंच धर्मेंद्रियांमध्ये श्रद्धा हे पहिले धर्मेंद्रिय मानले असून ते पंचबलातील पहिले बल गणले गेले आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे पालकांनी आपल्या मुलांना दर रविवारी बुद्धविहारात नेवून कट्टर बौद्ध बनविले पाहिजे. त्याचबरोबर पालकही कट्टर बौद्ध असले पाहिजेत.

## पूजेची पूर्वतयारी

सर्वच सामाजिक समारंभ, अगोदर पूजास्थान उभारुन पाठीमागे स्वच्छ पडदा लावून त्यापुढे साजरे केले जावेत. भिंतीलगत किंवा पाठीमागे स्वच्छ पडदा लावून त्यापुढे उंच टेबलावर किंवा स्टूलावर स्वच्छ कापड आच्छादून उत्तम बुद्धमुर्ती किंवा प्रतिमेशेजारी अथवा

थोड्या कमी उंचीच्या आसनावर किंवा खुर्चीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा ठेवावी. त्यापुढे दोन मेणबत्या आणि अगरबत्ती लावण्यासाठी योग्य अशी पात्रे ठेवावीत. मूर्तीच्या दोन्ही बाजूस फुलदाण्या ठेवाव्यात. समोर एखाद्या पात्रात सुटी फुले ठेवावीत. एकूण सर्वच सजावट मनोहर आणि चित्त प्रसन्न करणारी असावी. अर्थात ज्या काही सोई उपलब्ध असतील त्याप्रमाणे पूजास्थान सजवावे. त्याप्रमाणे त्याप्रसंगी लागणारे पुष्पहार, फूले, मेणबत्त्या, अगरबत्त्या वगैरे गोष्टी समोर जमिनीवर एखाद्या पात्रात अगर टोपलीत ठेवाव्यात. विवाह प्रसंगी कच्च्या सुताची गुंडी, पाणी भरलेले मडके हवे असल्यास ठेवावे.

पूजास्थान अतिशय उत्तम रितीने सजविले पाहिजे. आपल्या सौंदर्यदृष्टीला ते प्रसन्न दिलेले पाहिजे आणि श्रद्धेची भावना आणि विधायक मैत्रीचा भाव निर्माण होण्यास त्याचा उपयोग झाला पाहिजे. तसेच आपले सुत्तपठण अतिशय शिस्तबद्ध व सुस्वर असले पाहिजे. त्यामुळे आपला विधायक भाव उंचविण्यास सहाय्य होते आणि मन प्रसन्न होते.

## बावीस प्रतिज्ञा

(हिंदु व्यतिरिक्त इतर धर्मातील लोकांना त्यांच्या देवाच्या नकारात्मक प्रतिज्ञा देणे.)

१) मी ब्रम्हा, विष्णु, महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
२) मी राम, कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
३) मी गौरी, गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देव देवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
४) देवाने अवतार घेतले, यावर माझा विश्वास नाही.
५) बुद्ध हा विष्णूचा अवतार होय; हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय असे मी मानतो/मानते.
६) मी श्राद्धपक्ष करणार नाही, पिंडदान करणार नाही.
७) मी बौद्ध धम्माच्या विरूद्ध विसंगत असे कोणतेही आचरण करणार नाही.
८) मी कोणतेही क्रियाक्रम ब्राम्हणाच्या हातून करवून घेणार नाही.
९) सर्व मनुष्यमात्र समान आहेत असे मी मानतो/ मानते.
१०) मी समता स्थापण्याचा प्रयत्न करीन.
११) मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.
१२) मी भगवंताने सांगितलेल्या दहा पारमिता पाळीन.

१३) मी सर्व प्राणीमात्रांवर दया करीन व त्यांचे लालन पालन करीन.
१४) मी चोरी करणार नाही.
१५) मी व्यभिचार करणार नाही.
१६) मी खोटे बोलणार नाही.
१७) मी दारू पिणार नाही.
१८) प्रज्ञा, शील, आणि करूणा या बुद्ध धम्माच्या तीन तत्वांची सांगड घालून मी माझे जिवन चालवीन.
१९) मी माझ्या जुन्या, मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो/ करते व बौद्ध धम्माचा स्विकार करतो/ करते.
२०) तोच सद्धम्म आहे अशी माझी खात्री पटलेली आहे.
२१) माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो/ मानते.
२२) मी बद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन अशी प्रतिज्ञा करतो/ करते.

**“तुम्हाला जागे करायला पहाट दोनदा येत नाही”**

**- डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

## पंञ्चांग प्रणाम

बुद्धं नमामि। धम्म नमामि।। संघं नमामि।।।

याचना

याचना ओकास वन्दामि भन्ते।
द्वारत्तेयेन कत्तं सब्ब अपराधं खमतु में भन्ते।
दुतियम्पि ओकास वन्दामि भन्ते।।
द्वारत्तेयेन कत्तं सब्ब अपराधं खमतु में भन्ते।
ततियम्पि ओकास वन्दामि भन्ते।।
द्वारत्तेयेन कत्तं सब्ब अपराधं खमतु में भन्ते।

## त्रिसरण - पंञ्चशील याचना

ओकास अहं भन्ते।
तिसरेण सद्धिं पञ्चशीलं धम्मं याचामि।
अनुग्गहं कत्वा सीलं देथ मे भन्ते।
दुतियम्पि ओकास अहं भन्ते
तिसरेण सद्धिं पञ्चशीलं धम्मं याचामि।
अनुग्गहं कत्वा सीलं देथ मे भन्ते।
ततियम्पि ओकास अहं भन्ते।
तिसरेण सद्धिं पञ्चशीलं धम्मं याचामि।
अनुग्गह कत्वा सीलं देथ में भन्ते
भन्ते-यमहं वदामि तं वदेथ।
उपासक/ उपासिका– आम भन्ते।

## (पाली) वंदन

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्मबुद्धस्स।(३ वेळा)

## वंदन (मराठी)

त्या भगवान बुद्धाला माझे वंदन असो, जे अर्हंत,(जीवन मुक्त) सम्यक सम्बुद्ध (संपूर्ण जागृत) आहेत. (३ वेळा)

## त्रिसरण (पाली)

बुद्धं सरणं गच्छामी।।
धम्मं सरणं गच्छामी।।
संघं सरणं गच्छामी।।
दुतियम्पि, बुद्धं सरणं गच्छामी।।
दुतियम्पि, धम्मं सरणं गच्छामी।।
दुतियम्पि, संघं सरणं गच्छामी।।
ततियम्पि, बुद्धं सरणं गच्छामी।।
ततियम्पि, धम्मं सरणं गच्छामी।।
ततियम्पि, संघं सरणं गच्छामी।।

## तीन अनुसरणे (मराठी)

मी बुद्धाला अनुसरतो
मी त्यांच्या धम्माला अनुसरतो
मी त्यांच्या संघाला अनुसरतो
दुसऱ्यांदा मी बुद्धाला अनुसरतो
दुसऱ्यांदा मी त्यांच्या धम्माला अनुसरतो
दुसऱ्यांदा मी त्यांच्या संघाला अनुसरतो
तिसऱ्यांदा मी बुद्धाला अनुसरतो
तिसऱ्यांदा मी त्यांच्या धम्माला अनुसरतो
तिसऱ्यांदा मी त्यांच्या संघाला अनुसरतो

## पंञ्चशिलानि (पाली)

पाणातिपाता वेरमणी-सिक्खापदं समादियामि।।१।।
अदिन्नादाना वेरमणी-सिक्खापदं समादियामि।।२।।

कामेसु मिच्छाचारा वेरमणी-सिक्खापदं समादियामि।।३।।
मुसावादा वेरमणी-सिक्खापदं समादियामि।।४।।सुरा-मेरय-मज्ज-पमादट्ठाना वेरमणी-सिक्खापदं समादियामि।।५।।
साधूऽ साधूऽ साधूऽ

**पंचशील (मराठी)**

१) मी जीवहिंसेपासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.
२) मी चोरी करण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.
३) मी कामवासनेच्या अनाचारापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.
४) मी खोटे बोलण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.
५) मी मद्य, मादक तसेच मोहात पाडणाऱ्या मादक वस्तुंच्या सेवनापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.

साधूऽ साधूऽ साधूऽ

**अट्ठशील (पाली)**

पाणातिपाता वेरमणी-सिक्खापदं समादियामि।।१।।
अदिन्नादाना वेरमणी-सिक्खापदं समादियामि।।२।।
अब्रम्हचर्या वेरमणी-सिक्खापदं समादियामि ।।३।।
मुसावादा वेरमणी-सिक्खापदं समादियामि।।४।।
सुरा-मेरय-मज्ज-पमादट्ठाना वेरमणी-सिक्खापदं समादियामि।।५।।
विकाल भोजना वेरमणी सिक्खापदं समादियामि।।६।।
नच्च-गीत-वादित-विस्सूक-दस्सन, माला-गन्ध-विलेपन, धारण मण्डन विभूसन-ट्ठाना वेरमणी सिक्खापदं समादियामि ।।७।।
उच्चासन-महासयना वेरमणी-सिक्खापदं समादियामि।।८ ।।
तिसरणेन सद्धिं अट्ठाङगसमनागतं उपोसथं सीलं धम्मं साधुकं सुरक्खितं कत्वा अप्पमादेन सीलं सम्पादथे।।९।।

उपासक/उपासिका - आम भन्ते
साधूऽ साधूऽ साधूऽ

## अट्ठशील (मराठी)

१) मी जीवहिंसेपासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.
२) मी चोरी करण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.
३) मी ब्रम्हचर्याचे पालन करण्याची प्रतिज्ञा करतो.
४) मी खोटे बोलण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.
५) मी मद्य, मादक तसेच मोहात पाडणाऱ्या मादक वस्तुंच्या सेवनापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.
६) मी अवेळी भोजन करणार नाही.
७) मी नाच, गाणे, वाद्य, तमाशा इ. तसेच माळा, गन्ध, श्रृंगारिक आभुषण धारण करण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.
८) मी फार उंच आणि मौल्यवान आसनावर, शय्येवर झोपण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो.
९) त्रिसरण सह अष्टांग उपोसथ शील समाप्त झाले. शीलाप्रमाणे जीवन जगले पाहिजे.

उपासक/उपासिका ठिक आहे भन्ते

साधूऽ साधूऽ साधूऽ

## बुद्ध पूजा (पाली)

वण्ण-गन्ध-गुणोपेतं एतं कुसुमसन्तति।
पूजयामि मुनिन्दस्स, सिरीपादसरोरूहे।।१।।
पूजेमि बुद्धं कुसुमेन पुञ्ञेन मेत्तेन लभामि मोक्खं।
पुप्फं मिलायति यथा इदं मे, कायो तथा याति विनासभावं।।२।।
घनसारप्पदित्तेन, दिपेन तमधंसिना।
तिलोकदिपं सम्बुद्धं, पूजयामि तमोनुदं।।३।।
सुगंधिकाय-वदनं-अनन्त-गुणगंधिना।
सुगंधिना हं गंन्धेन, पूजयामि तथागतं।।४।।
बुद्ध धम्मं च संघं सुगततनुभवा धातुवो धातुगब्भे।
लंकाय जम्बुदीपे तिदस पुरवरे नागलोके च थूपे।।५।।
सब्बे बुद्धस्स बिम्बे सकलदसदिसे केस लोमादि धातु वंदे। सब्बेपि बुद्धं दसबलतनुजं बोधिचेत्यं नमामि।।६।।
वंदामि चेतियं सब्बं सब्बठानेसु पतिट्ठितं।
सारीरीक-धातु महाबोधी बुद्ध-रूपं सकलं सदा।।७।।

## बुद्ध पूजा (मराठी)

मुनिन्दाच्या श्रीपादकमलांची पूजा मी ह्या सुंदर, सुगंधी दोरा घातलेल्या फुलांच्या हाराने करतो।।१।। ह्या कुसुमांनी मी बुद्धाला पूजितो, ह्या पुण्याने मला निर्वाण प्राप्त होईल. हे फूल जसे कोमजते, तसे माझे शरीर विनाशाकडे जाईल।।२।। अंधकाराचा नाश करणाऱ्या, दाट आणि चक्क प्रकाश देणाऱ्या ह्या दिव्याने अज्ञानांधकाराचा नाश करणाऱ्या त्रिलोक्यदीप बुद्धाची मी पूजा करतो।।३।। अनेक प्रकारची सुगंधी द्रव्ये मिसळलेल्या ह्या गंधाने मी ज्याचे शरीर व मुख सुगंधी आहे, अशा तथागताची पूजा करतो।।४।। बुद्ध धम्म व संघ ह्यांना लंका, जंबूद्विप, नागलोक ह्यामधील स्तूपांतून बुद्धाच्या शरीरांतील जितके अवशेष स्थापित आहेत, त्या सर्वांना मी प्रणाम करतो।।५।। सगळ्या दाही दिशांमधून जितकी बुद्धाची रूपे आहेत, तसेच बुद्धाच्या शरीराचे केश वगैरे अवशेष स्थापिलेले आहेत, त्या सर्वांना मी प्रणाम करतो।।६।। सर्व ठिकाणी वसविलेल्या चैत्यांना, बुद्ध शरिराच्या अवशेषांना बोधिवृक्षाला मी वंदन करतो, ही सर्व बुद्धाचीच रूपे आहेत।।७।।

## भिम स्मरण (पाली)

सकलं विज्जं विधुरञ्ञानं देवरूपं सुजिव्हं
निमल चक्खु गभिर घोसं गौरवण्णं सुकायं।।
अभय चित्तं निभय कामं सुरत धम्मं सुपेम
विरत रज्जं सुजननेतं भिमरावं सरामि।
भिमरावं सरामि, भिमरावं सरामि।

## भिम स्मरण (मराठी)

सर्वोत्तम विद्यासंपन्न, तीक्ष्ण बुद्धीसंपन्न, दिव्यरूपी संपन्न, प्रभावशाली, ध्वनी संपन्न, गौर वर्ण, शरीर संपन्न, करुणा मैत्री संपन्न, भयरहित मन (अभय मन), निर्भयतेने धम्म कार्याला परिपूर्ण वाहून घेतलेले जनसेवेसाठी राजपदाचा त्याग केलेले, जनतेचे श्रेष्ठ नेते, अशा सर्वगुण संपन्न प. पूज्य भीमरावांचे मी स्मरण करतो.

**भीम स्तुती (मराठी)**

दिव्य प्रभरत्न तू, साधू वरदान तू
आद्य कुल भूष तू भिमराजा।।१।।
सकल विद्यापति, ज्ञान सत्संगति,
शास्त्र शासनमति बुद्धितेजा।।२।।
पंकजा नरवरा, रत्त स्वजन उद्धारा,
भगवंत आमुचा खरा, भक्तकाजा।।३।।
चवदार संगरी शस्त्र धरिता करी,
कांपला अरि उरि, रौद्र रूपा।।४।।
मुक्ती पथ कोणता, जिर्ण स्मृती जाळीता,
उजाळिला अगतिका, मार्ग साजा।।५।।
राष्ट्र घटना कृति, शोभते भारती,
महामानव बोलती, सार्थ सज्ञा।।६।।
शरण बुद्धास। शरण धम्मास।
शरण संघास मी भिमराजा।।७।।

**बुद्ध वंदना (पाली)**

इतिपि सो भगवा अरहं, सम्मासम्बुद्धो, विज्जा-चरण
सम्पन्नो सुगतो, लोकविदु, अनुत्तरो, पुरिस धम्मसारथी,
सत्था देव-मनुस्सानं, बुद्धो भगवा´ति।
बुद्धं याव जीवितं परियतं सरणं गच्छामि।।
ये च बुद्धा अतिताच, ये च बुद्धा अनागता।
पचुपन्नाच ये बुद्धा, अहं वन्दामि सब्बदा।।१।।
नत्थि मे सरणं अञ्ञं, बुद्धो मे सरणं वरं।
एतेन सच्चवज्जेन, होतु मे जय मंगलं।।२।।
उत्तमंगेन वन्दे´ह, पादपसुं वरूत्तमं।
बुद्धो यो खलितो दोसो, बुद्धो खमतु तं ममं।।३।।
यं किञ्चि रतनं लोके, विज्जति विविधा पुथु।
रतनं बुद्धसमं नत्थि, तस्मा सोत्थि भवन्तु मे।।४।।

यो सन्निसिन्नो वरबोधीमुले, मारं ससेनं महतिं विजेत्वा।
सम्बोधिमागच्छि अनंतञाणो, लोकोत्तमो तं पणमामि बिद्धं।।५।।

## बुद्ध वंदना (मराठी)

अर्हंत (जीवन मुक्त) सम्यक सम्बुद्ध (संपूर्ण जागृत) विद्या व आचरणांनी युक्त, सुगति ज्याने प्राप्त केलेली आहे. सर्वश्रेष्ठ, दमनशील पुरुषांचे, सारथी व आधार देणारे, देव व मनुष्य यांचे गुरु असे भगवान बुद्ध आहेत. अशा ह्या भगवंताचे जन्मभर अनुसरण करण्याचा मी निर्धार केला आहे.

मागे जे बुद्ध होऊन गेलेत, पुढे जे बुद्ध होतील व हल्ली जे बुद्ध आहेत, त्या सर्वांना मी सदासर्वदा वंदन करतो।।१।। माझे अन्य कोणीही शरणस्थान नाही. फक्त बुद्ध हेच माझे शरणस्थान आहे. ह्या सत्य वचनाने माझे जय मंगल होवो।।२।। बुद्धाच्या पवित्र चरणधुळीला मस्तक वाकवून मी नमन करतो, बुद्धाच्यासंबंधी माझ्या हातून काही दोष घडला असेल, तर त्याबद्दल बुद्ध भगवान मला क्षमा करो।।३।। ह्या जगात निरनिराळ्या प्रकारची जी अनेक रत्ने आहेत. त्यांपैकी बुद्धासमान अन्य कोणतेही रत्न नाही. या सत्य वचनाने माझे कल्याण होवो।।४।। ज्याने पूज्य बोधिवृक्षाखाली बसून माराच्या त्याच्या अफाट सेनेसह पराभव केला, अनंत ज्ञान प्राप्त करुन ज्याने सम्बोधी मिळविली, अशा सर्व श्रेष्ठ बुद्धाला मी वंदन करतो।।५।।

## धम्म वंदना (पाली)

स्वाक्खातो भगवता धम्मो सन्दिट्ठिको, अकालिको
एहिपस्सिको ओपनायिको पच्चतं वेदितब्बो वुञ्ञूही´ति
धम्मं याव जीवितं परियंतं सरण गच्छामि।।
ये च धम्मा अतिता च, ये च धम्मा अनागता।
पच्चुपन्ना च ये धम्मा, अहं वन्दामि सब्बदा।।१।।
नत्थि मे सरणं अञ्ञं, धम्मो मे सरणं वरं।
एतेन सच्चवज्जेन, होतु मे जयमंगलं।।२।।
´उत्तमंगेन वन्दे´हं धम्मं च, दुविधं वरं।
धम्मो यो खलितो, दोसो, धम्मो खमतु तं ममं।।३।।
यं किंञ्ची रतनं लोके, विज्जति विविधा पुथु।

रतनं धम्मसमं नत्थि, तस्मा सोत्थि भवन्तु मे।।४।।
अठ्ठाडि:गको अरियपथो जनानं,
मोक्खप्पवेसा उजुको´व मग्गो।
धम्मो अयं सन्तिकरो पणितो,
निय्यानिको तं पणमामि धम्मं।।५।।

## धम्म वंदना (मराठी)

भगवंताने ज्या धम्माचा सुंदर उपदेश केला आहे, ज्याचे सत्यत्व येथेच डोळ्यासमोर पाहता येते, जो धम्म आपले फळ ताबडतोब देतो, कोणीही ज्याचा अनुभव घ्यावा, जो निर्वाणाकडे घेऊन जातो हा सिद्धांत विज्ञानाच्या द्वारे स्वतः पाहता येतो. अशा या धम्माचे जन्मभर अनुसरण करण्याचा मी निर्धार करीत आहे.

मागे झालेल्या बुद्धाने जो धम्म उपदेशिला व पुढे होणारे बुद्ध जो धम्म सांगतील व हल्लीच्या बुद्धाने जो धम्म सांगितला आहे, त्या सर्वांना मी सदा सर्वदा वंदन करतो।।१।। मी दुसऱ्यांदा कोणाला शरण जाणार नाही, माझे अन्य कोणीही शरणस्थान नाही. बौद्ध धम्मच माझे एकमेव शरणस्थान आहे. ह्या सत्य उच्चाराने माझे जय मंगल होवो।।२।। सर्व दृष्टींनी श्रेष्ठ असलेल्या ह्या बुद्धाला मी मस्तक नम्र करून वंदन करतो. धम्मासंबंधी माझ्याकडून काही दोष घडला असेल तर तो धम्म त्याबद्दल मला क्षमा करो।।३।। ह्या जगात जी निरनिराळी अनेक रत्ने आहेत. त्यापैकी एकानेही बुद्ध धम्माची बरोबरी होणार नाही, ह्यामुळे माझे कल्याण होवो।।४।। हा बौद्ध धम्म एक असा सरळ मार्ग आहे की, जो शांतीकारक उत्तम मार्गाकडे घेऊन जाणारा, अष्टांगांनी युक्त, तसेच लोकांना सुख देणारा आहे. त्या धम्माला मी वंदन करतो।।५।।

## संघ वंदना (पाली)

सुपटिपन्नो भगवतो सावकसंघो, उजुपटिपन्नो भगवतो सावकसंघो, ञायपटिपन्नो भगवतो सावकसंघो, सामीचिपटिपन्नो भगवतो सावकसंघो यदिदं-चत्तारिपुरिस-युगानि, अठ्ठ पुरिस-पुग्गला, एस भगवतो सावकसंघो, आहुनेय्यो, पाहुनेय्यो दक्खिणेय्यो, अञ्जलि-करणीय्यो अनुत्तरं पुञ्ञक्खेतं लोकस्सा´ति।
संघं यावं जिवीतं परियंतं सरणं गच्छामि।।
ये च संघा अतिता च ये च संघा अनागता।

पच्चुपन्ना च ये संघा, अहं वन्दामि सब्बदा।।१।।
नत्थि मे सरणं अञ्ञं संघो मे सरणं वरं।
एतेन सच्चवज्जेन, होतु मे जयमंगलं।।२।।
उत्तमंगेन वन्दे´हं, संघं च तिविधोत्तमं।
संघो यो खिलतो दोसो, संघो खमतु तं ममं।।३।।
यं किञ्चि रतनं लोके, विज्जति विविधा पुथू।
रतनं संघसमं नत्थि तस्मा सोत्थि भवन्तु मे।।४।।
संघो विसुद्धो वरदक्खिणेय्यो, सन्तिद्रियो सब्बमलप्पहिनो। गुणेहिनेकेहि समिद्धिपत्तो।
अनासवे तं पणमामि संघं।।५।।

## संघ वंदना (मराठी)

भगवंताचा शिष्यसंघ सन्मार्गावर आरूढ आहे.भगवंताचा शिष्यसंघ सरळ मार्गावर आरूढ आहे. भगवंताचा शिष्यसंघ ज्ञानाच्या मार्गावर आरूढ आहे.भगवंताचा शिष्यसंघ उत्तम मार्गावर आरूढ आहे.

भगवंताचा शिष्यसंघ अशा नररत्नांचा आहे की, ज्यांनी वरील चारी जोड्या व आठ सतपदांची प्राप्ती करून घेतली आहे. हा संघ म्हणजे निमंत्रण देण्यास पात्र, स्वागत करण्यास योग्य, दान देण्यास योग्य तसेच जगात सर्वश्रेष्ठ, पुण्यक्षेत्रमय आहे. असा हा संघ वंदन करण्यास योग्य आहे. अशा या संघाला मी जिवंत असेपर्यंत शरण जातो.

जे भिक्षू संघ होऊन गेले ते, जे भिक्षुसंघ हल्ली आहेत आणि जे भिक्षुसंघ होणार आहेत, त्या सर्वांना मी वंदन करतो ।।१।। मला दुसरे कोणतेही शरणस्थान नाही, बुद्धाचा शिष्यसंघच माझे सर्वश्रेष्ठ शरणस्थान आहे. ह्या सत्यवचनाने माझे जयमंगल होवो ।।२।। तिन्ही प्रकारांनी श्रेष्ठ असलेल्या ह्या संघाला मी मस्तक वाकवून प्रणाम करतो. संघासंबंधी जर माझ्याकडून काही दोष घडला असेल, तर तो संघ मला त्याबद्दल क्षमा करो ।।३।। ह्या जगात जी निरनिराळी अनेक रत्ने आहेत, त्यापैकी एकाच्यानेही संघाची बरोबरी होणार नाही. त्याच्यामुळे माझे कल्याण होवो ।।४।।

संघ विशुद्ध, श्रेष्ठ, दान देण्यास योग्य, शांत इंद्रियांचा, सर्व प्रकारच्या मलांपासून अलिप्त, अनेक गुणांनी युक्त तसाच निष्पाप आहे. अशा ह्या संघाला मी प्रणाम करतो ।।५।।

**आदेश(पाली)**

चरथ भिक्खवे चारिकं बहुजन हिताय बहुजन सुखाय।
लोकानुकंपाय अत्थाय हिताय सुखाय देवमनुस्सानं।
देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं परियोसान कल्याणं। सात्थ सव्यज्जनं केवल परिपुण्णं परिसुद्ध ब्रम्हचरियं पकासेथं।
नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्मबुद्धस्स।
नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्मबुद्धस्स।
नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्मबुद्धस्स।

**आदेश(मराठी)**

हे भिक्खूंनो, बहुजनांच्या हितासाठी आणि सुखासाठी लोकांवर दया करणाच्या उद्देशाने देव आणि मनुष्य यांच्या कल्याणाकरिता, हिताकरिता, सुखाकरिता या धम्माचा प्रचार करा. भिक्खूंनो, आरंभी कल्याणकारक, मध्य कल्याणकारक व शेवटी कल्याणकारक अशा या धम्माचा ब्रम्हचर्य अंगिकार करुन स्वयं प्रकाशित व्हा आणि धम्म उपदेश करा.

**संकल्प (पाली)**

इमाय धम्मानुधम्म पटिपत्तिया बुद्धं पुजेमि।
इमाय धम्मानुधम्म पटिपत्तिया धम्मं पुजेमि।
इमाय धम्मानुधम्म पटिपत्तिया संघं पुजेमि।
अद्धा इमाय पटिपत्तिया जाति-जरा-मरण म्हा परिमुच्चिस्सामि।।२।।
इमिना पुञ्ञ कम्मेन, मा-मे बाल समागमो।
संत समागमो होतु, याव निब्बाण पत्तिया।।३।।
देवो वस्सतु कालेन, सस्स सम्पति हेतुच।
फीतो भवतु लोकोच, राजा भवतु धम्मिको।।४।।

## संकल्प (मराठी)

या धम्मचरणाने मी बुद्ध, धम्म व संघाची पूजा करतो।।१।। खचितच ह्या आचरणाने मी जन्म, जरा आणि मृत्यू यांच्यापासून मुक्त होईन।।२।। ह्या पुण्य कर्माने निर्वाणप्राप्ती पर्यंत, माझी मुर्खाशी संगती कधीही न घडो, नेहमी संत पुरूषांची संतती घडो।।३।। पिकांच्या वृद्धिकरिता वेळेवर पाऊस पडो, जगातील सर्व प्राणी आपली उन्नती करोत आणि शासक धम्मीत असोत।।४।।

## आहार पूजा (पाली)

सम्मासम्मबुद्धोञाणोयो, तिलोकेपच्चारहो।सनाथोपरिगण्हान्तु,
भोजनंमधुरंइमं।।१।।आदिवासेतुनोभन्ते, भोजनं परिकप्पितं। अनुकंम्पउपादाय,
पटिगण्हान्तुमुत्तमं।।२।।

## आहार पूजा (मराठी)

सम्यक, सम्बुद्ध, ज्ञानसागर भगवान बुद्धाची तिन्ही लोकी नाना प्रत्ययानी पूजा केली जाते. मी सुद्धा या उत्तम व प्रणीत भोजनाने त्याची करतो. हे भगवान! आमच्या या पूजेचा आपण स्विकार करावा।।१।। भन्ते! आम्ही पुढे ठेवलेल्या उत्तम भोजनाचा आपण कृपा करून स्विकार करावा।।२।।

## मूर्तीप्रतिष्ठापना (पाली)

इदं बुद्धं बिम्बे सब्बेहि देवं, मनुस्सेहि पुजेतुं।
इमस्मि विहारेपतिठ्ठपेमी इदंपूञ्ञं।
बोद्धी याणं पटिलाभाय सवंतत्।।

## मूर्तीप्रतिष्ठापना (मराठी)

या विहारात या भगवान बुद्धाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करीत आहोत. येथे येऊन श्रद्धेने सर्व उपासक, उपासिकांनो पूजा करावी या प्रतिष्ठापनेमुळे आम्हाला पुण्य व बोधिज्ञानाचा लाभ व्हावा असा संकल्प करीत आहोत.

## अट्ठाविस बुद्ध परित्राण पाठ

तण्हं करो महाविरो मेघं करो महायसो सरणं करो लोकहितो दिपं करो जुतिन्धरो कोण्डिगय्यो जनप्प मक्खो, मंगलो परिस्सत्थो, सुमनो, सुजुति, धिरो, रेवती रतिट्ठानो शोभितो गुण सम्पन्नो, अन्नोमदसी जनतमो पदमोलके पज्जतो, नारदा वरं सारथी, पथुमरोसब्ब लोकय्यो, पियदर्शी नरासमो अत्थदेसी कारूणीको धम्मदेसी तमोनुन्दो, सिद्धात्थो असय्यो, लोकहितो वरदस्सवरो फुस्सोवरद सम्बुद्धो विपस्सीच अनुपमो सिखि सब्ब हितैसी, विस्सभू सुखदायक ककुसन्ध सार्थवाह कोणागमन युद्धभूमी विजयी, काश्यप संपन्न सिद्धार्थ गौतम सम्यक सम्बुद्ध श्रेष्ठ, सत्यशील, शांती, मैत्रीवाले, सब्ब हितो सत्थ वस्स भु दुख दायको।।

## महाबोधी पूजा (पाली)

यस्स मुले निसिन्नो व सब्बरि विजयं अका<br>
पत्तो सब्बञ्ञूतं सत्था वंदे त बोधि पादपं।।<br>
इमे हे ते महाबोधी लोक नाथेन पुजिता<br>
अहम्पि ते नमस्सामि बोधिराजा नमस्त्थुते।।

## महाबोधी पूजा (मराठी)

तथागताने ज्या बोधीवृक्षाखाली बसूनच (राग, द्वेष, मोह आणि मार सेनादि) सर्व शत्रूंवर विजय मिळवूनच सर्वत्राला ज्ञानास प्राप्त केले आहे, त्या बोधीवृक्षास नमस्कार करितो. हे बोधीराज! बुद्धाद्वारे पूजीत आहे. मी सुद्धा ह्याची पूजा करतो. हे बोधीराज! तुम्हाला माझा नमस्कार असो.

# परित्राण पाठ (पाली)

विपत्ति पट्टिविहाय, सब्ब सम्पति सिद्धिया।सब्ब-रोगा विनासाय, भवे दिघायु दायकं।सब्ब दुक्खा विनासाय, भवे निब्बाण सन्तिके।
भन्ते अनुग्गहं कत्वा परितं ब्रुथ मंगलं।।१।।

समन्ता चक्क वालेसु, अत्रागच्छन्तु देवता।
सद्धम्म मुनि राजस्स सुणन्तु सग्ग मोक्खदं।
धम्मसवण कालो, अयं भदंता।
धम्मसवण कालो, अयं भदंता।
धम्मसवण कालो, अयं भदंता।

येसेन्ता सन्त चित्ता तिसरणं सरणा एत्थं लोकं तरे वा।
भुम्मा भुम्माच देवा गुण गण गहण्ण व्यावता सब्ब कालं।
एते आयुन्तु देवा वर कनकमये मेरू राजे वसन्तो।
सन्तो सन्तो सहेतुं मुनिवर वचनं सोतु मग्ग सुमग्ग।।३।।
सब्बेसु चक्कवालेसु, यक्खा देवाच ब्रह्मानो।
यं अम्हेहि कतं पुञ्ञं, सब्ब सम्पत्ति साधकं।
सब्बेतं अनुमोदित्वा, समग्गा सासनरता।
पमाद रहिता होन्तु, आरक्खासु विसेसतो।।४।।
सासनस्सच लोकस्स, वुड्ढि सब्बदा।
सासनप्पि च लोकञ्च, देवा रक्खन्तु सब्बदा।
सुद्धि सुखी होन्तु, सब्बे परिवारे हि अत्तनो।
अनिद्या सुमना होन्तु, सहसब्बेहि ञातिभि।।५।।
राजातो वा चोरतो वा।
मनुस्सतो वा, अमनुस्सतो वा।
अग्गियतो वा, उदकतो वा।
पिसाच्चतो वा, खानुकतो वा।
कणटकतो वा, नक्ख-त्ततो वा।
जनपद रोगतो वा, असद्धतो वा।
असन्दिट्ठितो वा, असद्धतो वा।
चण्ड-हत्थि अस्स मिगगोण।
कुक्कर-अहि विच्छिक।

मनिसप्प दीपी-अच्छ-तरच्छ।
सूकर महिस यक्ख सक्ख सादीहि।
नाना भयतो वा, नाना रोगतो वा। नाना उपद्धवतो वा, सब्बे आरक्खं गण्हतु।।६।।

## परित्राण पाठ (मराठी)

सर्व विपत्तींना नष्ट करणारे, सर्व संपत्तीचा लाभ करून देणारे, सर्व रोगांचा विनाश करणारे, दिर्घायूचा लाभ करून देणारे, सर्व दुःखाचा नायनाट करणारे, निर्वाणाच्या जवळ पोहचविणारे असे मंगल (परित्राणगाथा) भन्ते आमच्यावर अनुग्रह करून सांगावे।।१।। हे चक्रवालवासी सर्व देवतांनो! (श्रेष्ठ पुरूषांनो) निर्वाणपद प्राप्त करून भगवान बुद्धाच्या सत्धम्माला ऐकण्यासाठी इकडे यावे. ही धम्म श्रवण करण्याची योग्य वेळ आहे।।२।। जे शांत चित्ताचे, त्रिशरणाला अनुसरणारे, कुठल्याही ठिकाणी राहणारे, सदोसदित सत्कार्यात मग्न राहणारे, श्रेष्ठ पुरूषगण, सुमेरू पर्वतावर वास करणारे आहेत. ते सर्व शांत अशा श्रेष्ठ भगवान बुद्धाचे वचन ऐकण्याकरिता येथे आले आहेत।।३।। सर्व चक्रवालवासी देवतांमध्ये, यक्षामध्ये व ब्राम्हणामध्ये श्रेष्ठ असा जो, आमच्या सत्कार्यामुळे, आम्हाला यशप्राप्त झाले आहे त्याचे अनुमोदन करून, बौद्ध धम्मामध्ये रत होऊन, प्रमादापासून अलिप्त राहून त्याचे योग्य प्रकारे रक्षण करावे।।४।। सदोसदित बौद्ध धम्माची, त्याचप्रमाणे जनताची वृद्धी होवो, श्रेष्ठ लोक ह्या धम्माचे व जगताचे सर्वतोपरी रक्षण करोत. सर्व कुटूंबियांना व स्वतःला देखील सुख प्राप्त होवो. सर्वांना मानसिक सुखाला लाभ होवो।।५।। खालील भयापासून सर्वांचे रक्षण होवो- राजभय, चोरभय, मानवीभय, अमानवीभय, अग्निभय, जलभय (पूर वगैरे), पिशाच्यभय, गेंडाभय, कंटकभय, नक्षत्रभय, गभय, पापभय, मिथ्यादृष्टीभय, दुर्जनभय, उन्मत्तवानर, हत्ती, घोडा, हरिण, बैल, कुत्रा, सर्प, विंचू, मणियार, भुजंग, वाघ, घुबड, तरस, डुक्कर, रेडा, यक्ष आणि राक्षस इत्यादींच्या भयापासून सर्वांचे रक्षण होवो।।६।।

## धम्मपालन गाथा (पाली)

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा।
सचित्तपरियोदपनं एतं बुद्धानं सासनं।।१।।
धम्म चरे सुचरितं न तं दुच्चरितं चरे।
धम्मचारी सुखं सेति अस्मि लोके परम्हिच।।२।।
न तावता धम्मधरो यावता बहु भासती।

यो च अप्पम्पि सुत्वान धम्मं कायेन पस्सति।
सवे धम्मोधरो होती यो धम्मं नप्पमज्जति।।३।।

## धम्मपालन गाथा (मराठी)

कोणतेही अनाचार न करणे, सदाचार संपादन करणे, स्वचित्ताची वृद्धी करणे, हे बुद्धाचे सांगणे।।१।। चांगल्या प्रकारे धम्म आचारावा, वाईट प्रकारे नाही या लोकी आणि परलोकी धम्मचारी सुखाने झोप घेतो।।२।। पुष्कळ बोलण्याने धम्मधर होत नसतो, जो थोडसं शिकून धम्माचा प्रत्यक्ष अनुभव घेतो आणि धम्माची हेळसांड करीत नाही तोच धम्मधर होतो।।३।।

## महामङगल सुत्त (पाली)

एवं मे सुतं। एकं समयं भगवा सावत्थियं विहरती जेतवने अनाथ पिण्डकस्स आरामे। अथ खो अञ्ञतरा देवता अभिक्कन्ताय रत्तिया अभिक्कन्तवणा केवलकंप्पं जेतवनं ओभासेत्वा। येन भगवा तेनुपसङ्कमि, उपसङकमित्वा भगवन्तं अभिवादेत्वा। एकमन्तं आट्ठासि। एकमन्तं ठिता खो सा देवता
भगवन्तं गाथाय अज्झभासि:-
बहू देवा मनुस्सा च मङलानि अचिन्तुयुं।
आखङखमाना सोत्थानं, ब्रुहि मङगलमुत्तमं।।१।।
असेवना च बालानं, पण्डितानञ्च सेवना
पूजा च पूजनीयानं, एतं मङगलमत्तमं।।२।।
पतिरूपदेसवासो च, पुब्बे च कतपुञ्ञता।
अत्तसम्मापणिधि च, एतं मङगलमत्तमं।।३।।
बाहुसच्चं ञ्च सिपञ्च विनयो च सुसिक्खितो।
सुभासिता च या वाचा, एतं मङगलमुत्तमं।।४।।
माता-पितु उपट्ठानं, पुत्तदारस्स सङगहो।
अनाकुला च कम्मन्ता, एतं मङगलमुत्तमं।।५।।
दानं च धम्मचरिया च, ञायकातं च सङगहो।
अनवज्जानि कम्मानि, एतं मङगलमुत्तमं।।६।।
आरति विरती पापा, मज्जपाना च संञ्ञमो।

अप्पमादो च धम्मेसु, एतं मङ्गलमुत्तमं।।७।।
गारवो च निवातो च सन्तुट्ठी च कतञ्ञुता।
कालोन धम्मसवणं, एतं मङ्गलमुत्तमं।।८।।
खन्ति च सोवचस्सता, समणानञ्च दस्सनं।
कालेन धम्मसाकच्छा, एतं मङ्गलमुत्तमं।।९।।
तपो च ब्रम्हचरियञ्च, अरियसच्चान दस्सानं।
निब्बाणसच्छिकिरिया च, एतं मङ्गलमुत्तमं।।१०।।
फुट्ठस्स लोकधम्मेहि, चित्तं यस्स न कम्पति।
असोकं विरजं खेमं, एतं मङ्गलमुत्तमं।।११।।
एतादिसानि कत्वान, सब्बत्थमपराजिता।
सब्बत्थ-सोत्थि गच्छन्ति, तं तेसं मङ्गलमुत्तमं।।१२।।

## महामङ्गल सुत्त (मराठी)

एके वेळी भगवान श्रावस्ती येथे जेतवनात अनाथ पिण्डिकाच्या आश्रमात राहत होते तेव्हा रात्र संपत आली असता एक देवता सर्व जेतवन प्रकाशित करून भगवंताजवळ आली व भगवंताला वंदन करून एका बाजूला उभी राहिली. बाजूला उभी राहून ती देवता भगवंताला म्हणाली।

स्वतःचे कल्याण इच्छिणाऱ्या पुष्कळ देवांनी आणि माणसांनी मंगलाविषयी विचार केला, तेव्हा उत्तम मंगल कोणते ते आपण सांगा।।१।। मुर्खांची संगती न करणे, शहाण्या माणसांची संगत करणे व पूज्य लोकांच्या पूजा करणे हे उत्तम मंगल होय।।२।। अनुकूल स्थळी वास करणे, सुभ गोष्टी संपादन करणे आपल्याला सन्मार्गावर लावणे हे उत्तम मंगल होय।।३।। अंगी बहुश्रुतपणा असणे, कला संपादन करणे, अंगी शिष्ठता बाळगणे सुभाषण करणे हे उत्तम मंगल होय।।४।। आई-वडिलांची सेवा करणे, मुलबाळ बायको यांचा सांभाळ करणे व उलाढाली न करणे हे उत्तम मंगल होय।।५।।
दान देणे, धम्मचरण करणे, आप्तेष्ठांचा आदरसत्कार करणे, पापकर्मापासून अलिप्त राहणे हे उत्तम मंगल होय।।६।। काया, वाचा व मनाने अशुभ न करणे, मद्यपान न करणे आणि धम्म कार्यात तप्तर राहणे हे उत्तम मंगल होय।।७।। गौरव करणे, नम्रता बाळगणे, संतुष्ठ राहणे, केलेले उपकार स्मरणे आणि योग्य वेळी धम्म श्रवण करणे हे उत्तम मंगल होय।।८।। क्षमाशिल असणे, अंगी लीनता असणे, सज्जनांचे दर्शन घेणे आणि योग्य वेळी धम्म चर्चा करणे उत्तम मंगल होय।।९।। तप, ब्रम्हचर्याचे पालन, आर्य सत्याचे दर्शन आणि निर्वाणाचा

साक्षात्कार उत्तम मंगल होय।।१०।। ज्याचे मन लोक धम्माने विचलित होत नाही तो निःशोक, निर्मल आणि निर्भिड राहतो हे उत्तम मंगल होय।।११।। येणेप्रमाणे कार्य करून सर्वत्र अपराजित राहून लोककल्याणाला प्राप्त करतात हे त्यांच्या करिता (देव मनुष्या करिता) उत्तम मंगल होय।।१२।।

## करणीमेत्त सुत्त (पाली)

करणीयमत्थकुसलेन, यन्तं सन्तं पदं अभिसमेच्च।
सक्को उजू व सूजू च, सुवचो चस्स मुदु अनतिमानी।।१।।
सन्तुस्सको च सुभरो च, अप्प किच्चो च सल्लहुकवुत्ति।
सन्तन्द्रियो च निपको चं, अप्पगब्भो कुलेसु, अननुगिद्धो।।२।।
न च खुद्दं समाचरे किञ्चि, येन विञू परे उपवदेय्युं।
सुखिनो वा खेमिनो होन्तु। सब्बे सत्ता भवन्तु सुखितत्ता।।३।।
ये केचि पाणभूतऽत्थि तसा वा, थावरा वा अनवसेसा।
दिघा वा ये महन्ता वा, मज्झिमा रस्सका अणुकथूला।।४।।
दिट्ठा वा येव अदिट्ठा, ये च दूरे वसन्ति अविदूरे।
भूता वा सम्भवेसी वा, सब्बे सत्ता भवन्तु सुखितत्ता।।५।।
न परो परं निकंब्बेथ। नातिमञ्ञेथ कत्थाचि न किंञ्चि।
व्यारोसना पटिघस्सञ्ञा,नाञ्ञमञ्ञस्स दिक्खमिंच्छेय्य।।६।।
माता यथा नितं पुतं, आयुसा एकपुत्तं मनुरक्खे।
एवम्पि सब्ब-भुतेसु, मानसं भावयं अपरिमाणं।।७।।
मेतञ्च सब्ब-लोकास्मिं, मानसं भावये अपरिमाणं।
उद्धं अधो च तिरियञ्च, असम्बाधं अवेरं असपत्तं।।८।।
तिट्ठं चरे निसिन्नो वा, सयानो वा यावतस्स विगतमिद्धो।
एतं सतिं अधिट्ठेय्य, ब्रह्ममे´तं विहारं इधमा´हु।।९।।
दिट्ठिञ्च अनुपगब्भ, सीलवा दस्सनेन सम्पन्नो।
कामेसु विनेय्य गेधं, न´हि जातु गब्भसेय्यं पुनरेती´ति।।१०।।

## करणीमेत्त सुत्त (मराठी)

शान्ति पदाची प्राप्ती इच्छिणाऱ्या कल्याणसाधननिपुण मनुष्याला ही इच्छा पाहिजे की त्याने योग्य, सरळ अत्यंत सरळ बनावे, त्याची वाणी सुंदर असावी व तो मृदू आणि निराभिमानी असावा।।१।। तो संतुष्ट असून प्रामाणिक उपायांनी जगणारा असावा. तो उलाढाली करणारा नसावा आणि तो समाधानी, शांन्त-इंद्रिय, प्रज्ञावान गंभीर व कुटूंबात अनासक्त असावा, आसक्त नसावा।।२।।

त्याच्या हातून क्षुल्लकांत क्षुल्लक देखील असे कृत्य घडो की ज्याकरिता सूज्ञ लोक त्याला दोष लावतील. सर्व प्राणी सुखी, क्षेमवान आनंदी राहोत, ही भावना त्याने सदैव बाळगावी।।३।। जंगम अथवा स्थावर, दीर्घ अथवा महान, मध्यम अथवा लहान, सूक्ष्म अथवा स्थूल, दृष्ट अथवा अदृष्ट, दूरस्थ अथवा जवळ उत्पन्न होणारे जितके म्हणून प्राणी आहेत ते सर्व सुखात नांदोत।।४-५।। कोणी दुसऱ्याला फसवू नये, कोणी दुसऱ्याचा अपमान करू नये, शत्रुत्वाचा अथवा विरोधाच्या भावनेने कोणी अशी इच्छा न बाळगो की, दुसरे दुःखी होवोत।।६।। आपल्या प्राणाची पर्वा न करिता ज्याप्रमाणे आई आपल्या एकुलत्या एका मुलाचे रक्षण करते त्याचप्रमाणे शांती पदाची इच्छा करणाऱ्या प्राणीमात्राबद्दल निस्सीम प्रेमभाव वाढवा।।७।। वर, खाली आणि मधील सर्वलोक आणि प्राणी याबद्दल निवर आणि शत्रुत्वरहित मैत्री भावना बाळगावी।।८।। उभे असता, चालले असता, बसले असता झोपले असता-जोपर्यंत जागे आहात तोपर्यंत ही मैत्री भावना कायम ठेवावी, हिलाच ब्रम्हविहार म्हणतात।।९।। असा शिलवान व सम्यक दृष्टीसंपन्न मनुष्य कोणत्याही मिथ्था दृष्टित न पडता काम तृष्णेचा नाश करून जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होतो।।१०।।

## पुण्यानुमोदन (पाली)

दुक्खपत्ताच निदुक्खा भयपत्ताच निब्भया।
सोकपत्ताच निसोक्का होन्तु सब्बेपि पाणि नो।।१।।
एतावताच अम्हे हि सम्भतं पुञ्ञ सम्पदं।
सब्बे देवानु मोदन्तु सब्ब सम्पति सिद्धिया।।२।।
दानं ददन्तु सद्धाय सीलं रक्खन्तु सब्बदा।
भावना भिरता होन्तु गच्छन्तु देवतांगता।।३।।
सब्बे बुद्धा बल पत्ता पच्चे कानञ्च यं बलं।
अरहन्तानञ्च तेजेन रक्खं बन्धामि सब्बेसो।।४।।

आकासट्टा च भुम्मट्टा देवा नागा महिद्धिका।
पुञ्ञं तं अनुमोदित्वा चिरं रक्खन्तु सासनं।।५।।
आकासट्टाच भुम्मट्टा देवा नागा महिद्धिका।
पुञ्ञं तं अनुमोदित्वा चिरं रक्खंतु देसनं।।६।।
आकासट्टाच भुम्मट्टा देवा नागा महिद्धिका।
पुञ्ञं तं अनुमोदित्वा चिरं रक्खन्तु त्वं परन्ति।।७।।

## पुण्यानुमोदन (मराठी)

समस्त दुःखी प्राणी दुःखरहित, भयप्राप्त प्राणी भयरहित आणि शोकरहित होवोत।।१।। हे जे आम्ही सर्व पुण्य मिळवून देणारे पुण्यार्जन केले आहे. सर्व देवता त्याला अनुमोदन देवोत।।२।।

श्रद्धेने दान देण्यात येवो, शीलांचे पालन केले जावो, भावना संपादन करण्यात येवो आणि निर्वाण गती मिळो।।३।। मी बुद्धाच्या सर्व बल प्राप्त, प्रत्येक बुद्धाच्या आणि अर्हतांच्या प्रतापाने आपले सर्व प्रकारे रक्षण करतो।।४।। आकाशात आणि भूमीवर राहणाऱ्या महाप्रतापी देवता आणि नाग ह्या पुण्याचे अनुमोदन करून चिरकाल पर्यंत शासनाचे बौद्ध धम्माचे रक्षण करोत।।५।। आकाशात आणि भूमीवर राहणाऱ्या महाप्रतापी देवता आणि नाग ह्या पुण्याचे अनुमोदन करून चिरकालपर्यंत धम्मोपदेशाचे रक्षण करोत।।७।।

## महामङ्गल गाथा (पाली)

महाकारूणिको नाथो हिताय सब्ब पाणिनं,
पुरेत्वा पारमी सब्बा पत्तो सम्बोधि-मुत्तमं।
एतेन सच्चवज्जेन होतु ते जयमङ्गलं।।१।।
जयन्तो बोधिया मुले सक्यानं नन्दिवड्ढणो।
एवं तुय्हं जयो होतु जयस्सु जयमङ्गलमं।।२।।
सक्कत्वा बुद्ध रतनं ओसधं उत्तनं वरं,
हितं देवा मनुस्सानं बुद्ध तेजेन सोत्थिना।
नस्सन्तुपद्दवा सब्बे दुक्खा दुपसमेन्तु ते।।३।।
सक्कत्वा धम्म रतनं ओसघं उत्तमं वरं,
परिलाहूपसमनं धम्म तेजेन सोत्थिना।

नस्सन्तुपद्दवा सब्बे भया दुपसमेन्तु ते।।४।।
सक्कत्वा संघं रतनं ओसघं उत्तमं वरं,
आहुनेय्यं पाहुणेय्यं संघं तेजेन सोत्थिना।
नस्सन्तुपद्दवा सब्बे रोगा वुपसमेन्तु ते।।५।।
यं किंञ्चि रतनं लोके विज्जति विविधा पुथु,
रतनं बुद्धसमं नत्थि तस्मा सोत्थि भवन्तु ते।।६।।
यं किञ्चि रतनं लोके विज्जति विविधा पुथु,
रतनं धम्मसमं नत्थि तस्मा सोत्थि भवन्तु ते।।७।।

## महामङ्गल गाथा (मराठी)

महाकारूणिक भगवान बुद्धाने समस्त प्राण्यांच्या कल्याणाकरिता सर्व पारमिता पूर्ण करून उत्तम ज्ञान संपादन केले ह्या सत्य वचनाने तुझे मंगल होवो।।१।। बोधिवृक्षाखाली बसून ज्याप्रमाणे शाक्यसिंह भगवान बुद्धाने जय मिळविला त्याचप्रमाणे तुझा जय होवो, तुझा जय व मंगल होवो।।२।। जे बुद्ध रत्न उत्तम व श्रेष्ठ औषध आहे व जे देव आणि मनुष्याकरिता हितकारी आहे अशा बुद्ध-रत्नांचा सत्कार केल्यामुळे बुद्धाच्या प्रतापाने सर्व उपद्रव नष्ट होवो आणि तुझे सर्व दु:ख शांत होवो।।३।। जे धम्म रत्न उत्तम व श्रेष्ठ औषध आहे व जे पीडेला शांत करणारे आहे अशा धम्म रत्नांचा सत्कार केल्यामुळे धम्माच्या प्रभावाने समस्त उपद्रव नष्ट होवो आणि तुझे सर्व भय शांत होवो।।४।। जे संघ रत्न उत्तम श्रेष्ठ औषध आहे व जे आमंत्रणाला व पाहुणचाराला पात्र आहे, अशा संघ-रत्नांचा सत्कार केल्यामुळे संघाच्या प्रभावाने सर्व उपद्रव नष्ट होवो आणि तुझे सर्व रोग शांत होवो।।५।। ह्या जगात जी कोणतीही भिन्न रत्ने विद्यमान आहेत त्यामध्ये बुद्ध-रत्नासारखे दुसरे रत्न नाही, ह्यामुळे तुझे कल्याण होवो।।६।। ह्या जगात जी कोणतीही भिन्न रत्ने विद्यमान आहेत त्यामध्ये धम्म-रत्नासारखे दुसरे रत्न नाही, ह्यामुळे तुझे कल्याण होवो।।७।। ह्या जगात जी कोणतीही भिन्न रत्ने विद्यमान आहेत त्यामध्ये संघ-रत्नासारखे दुसरे रत्न नाही, ह्यामुळे तुझे कल्याण होवो।।८।। भगवान बुद्धाशिवाय अनुसरण्यास दुसरे उत्तम कोणी नाही, म्हणून मी भगवान बुद्धाला अनुसरतो, ह्या सत्य वचनाने तुझे कल्याण होवो।।९।। धम्माशिवाय अनुसरण्यास दुसरे उत्तम कोणी नाही, म्हणून मी भगवान बुद्धाला अनुसरतो, ह्या सत्य वचनाने तुझे कल्याण होवो।।१०।। संघाशिवाय अनुसरण्यास दुसरे उत्तम कोणी नाही, म्हणून मी भगवान बुद्धाला अनुसरतो, ह्या सत्य वचनाने तुझे कल्याण होवो।।११।। सर्व संकटे दूर होवोत, सर्व रोग नष्ट होवो, तुला विघ्नबाधा न होवो आणि तू सुखी आणि दिर्घायू

होवो।।१२।। तुझे सर्व मंगल होवो, सर्व देवता तुझे रक्षण करोत, सर्व बुद्धांच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।१३।। तुझे सर्व मंगल होवो,सर्व देवता तुझे रक्षण करोत, धम्माच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।१४।। तुझे सर्व मंगल होवो,सर्व देवता तुझे रक्षण करोत, संघाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।१५।। नक्षत्र, यक्ष आणि भूत व वाईट ग्रहांचे दोष आणि सर्व उपद्रव ह्या परित्राण पाठाच्या प्रतापाने नष्ट होवोत।।१६।। जे वाईट निमित्त आहेत, अपशकुन आहेत, पक्षाचे अप्रिय शब्द आहेत, वाईट ग्रहांचे दोष आहेत, ते सर्व बुद्धाच्या प्रतापाने नष्ट होवोत।।१७।। जे वाईट निमित्त आहेत, अपशकुन आहेत, पक्षाचे अप्रिय शब्द आहेत, वाईट ग्रहांचे दोष आहेत, ते सर्व धम्माच्या प्रतापाने नष्ट होवोत।।१८।। जे वाईट निमित्त आहेत, अपशकुन आहेत, पक्षाचे अप्रिय शब्द आहेत, वाईट ग्रहांचे दोष आहेत, ते सर्व संघाच्या प्रतापाने नष्ट होवोत।।१९।।

## रतन सुत्त (पाली)

यानिध भुतानि समागतानि। भूम्मानि वा यानि´व अन्तलिक्खे।
तथागतं देवमनुस्सपूजितं। बुद्धं नमस्साम सुवत्थि होतु।।१।।
यानिध भुतानि समागतानि। भूम्मानि वा यानि´व अन्तलिक्खे।
तथागतं देवमनुस्सपूजितं। धम्मं नमस्साम सुवत्थि होतु।।२।।
यानिध भुतानि समागतानि। भूम्मानि वा यानि´व अन्तलिक्खे।
तथागतं देवमनुस्सपूजितं। संघं नमस्साम सुवत्थि होतु।।३।।
यानिध भुतानि समागतानि। भूम्मानि वा यानि´व अन्तलिक्खे।
सब्बेव भूता सुमना भवन्तु। अथोपि सक्कच्च सुणन्तु भासितं।।४।।
तस्मा हि भूता निसामेथ सब्बे। मेत्तं करोथ मानुसिया पजाय।
दिवाचरत्तोवहरन्तियेबलिं। तस्माहिनेरक्खथ आप्पमत्ता।।५।।
यं किंञ्चि वित्तं इधं वा हुरं वा। सग्गोसु वा यं रतनं पणीतं।
न नो समं अत्थि तथागतेन। इदम्पि बुद्धे रतनं पणीतं।
एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।६।।
खयं विरागं अमतं पणीतं। यदज्झगा सक्यनुनी समाहितो न तेन धम्मेन समात्थि किंञ्चि।इदम्पि धम्मे रतनं पणीतं।
एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।७।।
ये बुद्धसेट्ठो परिवण्णायि सुचिं। समाधिमानन्तरिकञ्ञामाहू।
समाधिना तेन सभो न विज्जति। इदम्पि बुद्धे रतनं पणीतं।

एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।८।।
ये पुग्गला अट्ठ सतं पसत्था। चत्तारी युतानि युगानि होन्ति।
ते दक्खिणेय्या सुगतस्स सांवका। एतसु दिन्नानि महात्फलानि।
इदंऽपि संघे रतनं पणीतं।एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।९।।
ये सुप्पयुत्ता मनसा दळ्हेन। निक्कामिनो गोतमसासनम्हि।
ते पत्तिपत्ता अमतं विगय्ह। लद्धा मुधा निब्बुति भुञ्जमाना।
इदंऽपि संघे रतनं पणीतं।एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।१०।।
याथिन्दखीलो पठविं सितोसिया। चतुब्भि वातेहि असम्पकम्पियो।
तथूपमं सप्पुरिसं वदामि। यो अरियसच्चानि अवेच्च पस्सति।
इदंऽपि संघे रतनं पणीतं।एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।११।।
ये अरियसच्चानि विभावयन्ति। गंभीरपञ्ञेन सुदेसितानि।
किञ्चापिते होन्तु भुसप्पमत्ता। न ते भवं अट्ठम आदियन्ति।
इदंऽपि संघे रतनं पणीतं।एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।१२।।
सहाव॑स्स दस्सनसंपदाय। तयस्सु धम्मा जहिता भवन्ति।
सक्कायदिट्ठि विचिकिच्छितंच। सीलब्बतंवा॑पि यदत्थि किञ्चि।
चतूहपायेहि च विप्पमुतो। छ चाभिट्ठानानि अभब्बो कांतु।
इदंऽपि संघे रतनं पणीतं।एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।१३।।
किञ्चापि सो कम्म करोति पापकं कायेन वाचाउद चेतसा वा।
अभब्बो सो तस्स पटिच्छदाय। अभब्बता दिट्ठ पदस्स वुत्ता।
इदंऽपि संघे रतनं पणीतं।एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।१४।।
वनप्पगुम्बे तथा फुस्सितग्गे। गिम्हाणमासे पठमस्मिं गिम्हे।
त्तथूपमं धम्मवरं अदेसयि निब्बाणगामि परम हिताय।
इदंऽपि बुद्धे रतनं पणीतं।एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।१५।।
वरो, वरञ्ञू, वरदो वराहरो। अनुत्तरो धम्मवरं अदेसयि।
इदंऽपि बुद्धे रतनं पणीतं।एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।१६।।
खीणंपुराणं नव नत्थि संभवं। वरत्तचित्ता आयतिके भवस्मि।
ते खीणबीजा अविरूंळिहछन्दा। निब्बन्ति धीरा। यथा॑यं पदीपो
इदंऽपि संघे रतनं पणीतं।एतेन सच्चेन सुवत्थि होतु।।१७।।

# रतन सुत्त (मराठी)

जे काही भूमिगत किंवा अंतरिक्षातील प्राणी येथे जमले असतील त्यांना मी विनंती करतो की, आपण तथागताला (बुद्धाला) नमस्कार करू; जेणेकरुन तुमचे कल्याण होईल।।१।। जे काही असतील त्यांना मी विनंती करतो की, ज्याला सर्व मनुष्य आणि देवादी पूज्य मानतात, त्या तथागताच्या धम्माला नमस्कार करू; जेणेकरुन तुमचे कल्याण होईल।।२।। जे काही भूमिगत किंवा अंतरिक्षातील प्राणी येथे जमले असतील त्यांना मी विनंती करतो की, ज्याला सर्व मनुष्य आणि देवादी पूज्य मानतात, त्या तथागताच्या संघाला नमस्कार करू; जेणेकरुन तुमचे कल्याण होईल।।३।। भूमिगत किंवा अन्तरिक्षातील जे येथे प्राणी जमले असतील ते सर्व प्राणी आनंदीत होवोत, आणि सुभाषित आदरपूर्वक ऐकोत।।४।। म्हणून हे सर्व प्राण्यांनो, हे ऐका व मनुष्य जातीवर प्रेम करा रात्रंदिवस मनुष्य तुमची जोपासना करतात. म्हणून त्यांचे तुम्ही सावधान रक्षण करा।।५।। इह किंवा परलोकी जे धन असेल, किंवा स्वर्गात जे उत्तम रत्न असेल ते आमच्या तथागताच्या तोडीचे असणार नाही, बुद्धांचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।६।।ज्या निश्चल मनाच्या शाक्यमुनीने तृष्णामय, विरागमय, अमर असो जो उत्तम धम्म जाणला, त्याच्यासारखा दुसरा नाही, धम्माचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।७।।ज्या शुद्ध समाधीची बुद्धश्रेष्ठाने प्रशंसा केली. जिला ताबडतोब फळ देणारी म्हणतात, त्या समाधीसारखी दुसरी नाही. धम्माचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।८।। सज्जनांना पसंत ज्या आठ व्यक्ती, ज्यांच्या चार जोड्या होतात, ते सुगताचे श्रावक पूजनीय होत. त्यांना दिलेले दान महाफलदायक होते; संघाचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।९।। जे सर्वस्वाचा त्याग करून दृढ मनाने गौतमाच्या धम्मात प्रवेश करतात, ते प्राप्तव्य करून आणि अमृताचे अवगाहन करून अनासाये मिळविलेल्या शांतीचा उपभोग घेतात. संघाचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।१०।। नगरद्वारासमोर जमिनीत (खोल रोवून) उभारलेला स्तंभ जसा चारही बाजूंच्या वाऱ्यांनी हालत नाही, तसा जो चार आर्यसत्य विचारपूर्वक जाणतो तो सत्पुरूष आहे, असे मी म्हणतो. संघाचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।११।। जे गंभीर-प्रज्ञेने (बुद्धाने) उत्तम रितीने उपदेशिलेल्या चार आर्यसत्य सत्यांची भावना करतात, ते जरी किती बेसावधपणे वागले तरी आठवा जन्म घेत नाहीत. संघाचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।१२।।सम्यक दृष्टी प्राप्त झाल्यावर तो (वरच्यापैकी एक) देहत्मदृष्टी

कुशंका व व्रत उपासासारख्या एखाद्या गोष्टींवर असलेला विश्वास या तीन गोष्टी सोडून देतो. चार दुर्गतींपासून मुक्त होतो व सहा गोष्टी त्याच्या हातून घडणे असंभवनीय होते. संघाचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।१३।। जर त्याच्याकडून कायेने, वाचेने किंवा मनाने काही पाप घडले, तर ते तो कदापि झाकून ठेवणार नाही. असले कृत्य (निर्वाण) पद ज्याने पाहिले आहे, अशाच्या हातून शक्य नाही. संघाचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।१४।। उन्हाळ्याच्या पहिल्या महिन्यात जसा एखादा वनगुल्म साग्र प्रफुल्लित व्हावा, तद्वत बुद्धाने निर्वाणगामी परमश्रेष्ठ धम्म लोकहितार्थ उपदेशिला. बुद्धाचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।१५।। श्रेष्ठ, श्रेष्ठज्ञ, श्रेष्ठद श्रेष्ठ असणारा अनुत्तर अशा बुद्धाने श्रेष्ठ धम्म उपदेशिला आहे. बुद्धाचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।१६।। ज्याने जुने कर्म क्षीण झाले आहे व नवे उत्पन्न होत नाही, जे भावी जन्माविषयी निरपेक्ष, ते क्षीणबीज आणि उत्पत्तीच्छन्द विरहित धीर पुरूष ह्या प्रदीपाप्रमाणे निर्वाण पावतात. संघाचे ठायी वसणारे हे उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्याने तुमचे कल्याण होईल।।१७।।

## सब्ब सुख गाथा (पाली)

सब्बे सत्था सुखी होन्तु, सब्बे होन्तुच खेमिनो।
सब्बे भद्राणि पस्सन्तु, माकञ्चि दुक्खमागमा।।१।।
यानि´ध भूतानि समागतानि भूम्मानिवायानिव अन्तलिक्खे।
सब्बे भूता सुमना भवन्तु अथोपि सक्कच्च सुणन्तु भासितं।।२।।
तस्मा हि भूता निमामेथ सब्बे मेतं करोथ मानूसिया पजाय।
दिवाच रत्तोच हरन्ति ये बलि तस्माहिने रक्खथ अप्पमत्ता।।३।।

## सर्व सुख गाथा (मराठी)

सारे प्राणी सुखी होवोत, सर्वांचे कल्याण होवो, सर्वांना हिताचा मार्ग सापडो, कोणालाही दुःख न होवो।।१।। भूतलावरील (पृथ्वी) आणि आकाशामधील जेवढे प्राणीमात्र येथे उपस्थित आहेत ते सर्व प्राणीमात्र समाधानी होवोत, आणि हे बोलणे लक्ष देऊन ऐकोत।।२।। म्हणून सर्व प्राणीमात्रांनो ऐका, मानवी प्रजेवर प्रेम करा, जे तुमच्या हिताकरिता अहोरात्र झटतात त्यांचे जागरूकपणे रक्षण करा।।३।।

# पराभव सुत्त (पाली)

एवं मे सुतं। एकं समया भगवा सावत्थियं विहरती जेतवनें
अनाथपिण्डिकस्स आरामे।। अथ खो अञ्ञतरा देवता
अभिक्कन्ताय रत्तिया अभिक्कन्तवण्णा केवलकप्पं जेतवनं ओभासेत्वा येन भगवा तेनुपसङ्कामि। उपसङ्कमित्वा भगवन्तं अभिवादेत्वा एकमन्तं अट्ठासि। एकमन्तं ठिता सो खा देवता भगवन्तं गाथाय अज्झभासि-

पराभवन्तं पुरिसं मयं पुच्छाम गोतमं।
भगवन्तं पुठुमागस्स, किं पराभवतो मुखं।।१।।

सुविज्जनो भवं होति, अविज्जानो पराभवो।
धम्मकामो भवं होति, धम्मदेसी पराभवो।।२।।

इति हेतं बिजानाम, पठमो सो पराभवो।
दुतियं भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।३।।

असन्तरस्स पिया होन्ति, सन्ते न कुरूते पियं।
असतं धम्मं रोचेति, तं पराभवतो मुखं।।४।।

इति हेत बिजानाम, दुतियो सो पराभवो।
ततियं भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।५।।
निद्दासिली सभासिली अनुट्ठाता च यो नरो।
अलसो कोधपञ्ञाणो, तं पराभवतो मुखं।।६।।

इति हेत बिजानाम, ततियो सो पराभवो।
चतुत्थं भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।७।।

यो मातरं वा पितरं वा जिण्णकं गतयोब्बन।
पहु सन्ते न भरति, तं पराभवतो मुखं।।८।।

इति हेत बिजानाम, चतुत्थो सो पराभवो।
पञ्चम भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।९।।

यो ब्राम्हण वा समणं वा अञ्ञ वा पि वनिब्बकं।
मुसावादेन पञ्चेति, तं पराभवतो मुखं।।१०।।

इति हेत बिजानाम, पञ्चमो सो पराभवो।
छट्ठम भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।११।।

पहूतवित्तो पुरिसो सहिरज्जो सभोजनो।
एको भुञ्जति सादूनि, तं पराभवतो मुखं।।१२।।

इति हेत बिजानाम, छट्ठमो सो पराभवो।
सत्तम भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।१३।।
जातित्थद्धो धनत्थद्धो गोत्तत्थद्धो च यो नरो।
सञ्जाति अतिमञ्ञेति, तं पराभवतो मुखं।।१४।।
इति हेत बिजानाम, सत्तमो सो पराभवो।
अट्ठम भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।१५।।
इत्थिधुत्तो सुराधुत्तो, अक्खधुत्तो च यो नरो।
लद्धं लद्धं विनासेति, तं पराभवतो मुखं।।१६।।
इति हेत बिजानाम, अट्ठमो सो पराभवो।
नवम भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।१७।।
सेहि दारेहि असंतुट्टो वेसियासु पदिस्सति।
दिस्सति परदारे सु, तं पराभवतो मुखं।।१८।।
इति हेत बिजानाम, नवमो सो पराभवो।
दसम भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।१९।।
अतीतयोब्बनो पोसो आनेति तिम्बुरूत्थिनिं।
तस्मा इस्मा न सुपति, तं पराभवो मुखं।।२०।।
इति हेत बिजानाम, दसमो सो पराभवो।
एकादसम भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।२१।।
इत्थि सोण्डि विकिरणिं पुरिसं वा´ति तादिसं।
इस्सारियस्मि गपेति, तं पराभवो मुखं।।२२।।
इति हेत बिजानाम, एकादसमो सो पराभवो।
द्वादसम भगवा ब्रुहि, किं पराभवतो मुखं।।२३।।
अप्पभोगो महातण्हो खत्तिये जायते कुले।
सोधं रज्जं पत्थयति, तं पराभवो मुखं।।२४।।
एते पराभवे लोके पण्डितो समवेक्खियं।
अरियो दस्सनसम्पन्नो स लोकं भजते जिवति।।२५।।

## पराभव सुत्त (मराठी)

असे मी ऐकले आहे- एके समयी समय भगवान बुद्ध श्रावस्ती येथे अनाथ पिण्डकाच्या जेतवनात आरामात राहत होते तेव्हा रात्र संपत आली असता, एक अत्यंत सुंदर

देवता सर्व देवगणासह जेतवन प्रकाशित करून भगवान बुद्ध होते तेथे येऊन भगवंताला मनस्कार करून एका बाजूला उभी राहिली आणि ती देवता भगवंताला पद्यात म्हणाली-

आम्ही भगवंताला विचारण्यासाठी आलो आहोत, पराभव पावणारा पुरूष कोणता व पराभवाचे कारण काय ।।१।। (भगवान बुद्ध म्हणाले) वृद्धिंगत होणारा पुरूष सहज जाणता येतो व पराभव पावणारा ही सहज जाणता येतो. वृद्धिंगत होणारा धर्म पारायण असतो व पराभव पावणारा धर्माचा द्वेष करतो।।२।। (देवता) हा पहिला पराभव आम्हाला समजला. भगवान दुसरे पराभवाचे कारण कोणते हे सांगा ।।३।। ज्याला खल आवडतात, सज्जनांविषयी प्रेम नसते त्याला खलांचा धर्म रूचतो, हे पराभवाचे दुसरे कारण होय ।।४।। हा दुसरा पराभव आम्हास समजला, भगवान तिसरे पराभवाचे कारण कोणते हे सांगा ।।५।। निद्राशिल, सभाप्रिय, प्रत्य न करणारा, आळशी आणि क्रोधिष्ट जो मनुष्य होतो हे त्याच्या पराभवाचे कारण होय ।।६।। हा तिसरा पराभव आम्हास समजला, भगवान चौथे पराभवाचे कारण कोणते हे सांगा ।।७।। जो समर्थ असून वयातीत वृद्ध आईबापांचा सांभाळ करीत नाही, त्यांची सेवा करीत नाही हे त्याच्या पराभवाचे कारण होय।।८।।हा चौथा पराभव आम्हास समजला, भगवान पाचवे पराभवाचे कारण कोणते हे सांगा ।।९।। जो ब्राम्हणाला, श्रमणाला किंवा दुसऱ्या गरीब मनुष्याला खोटे बोलून ठकावतो हे त्याच्या पराभवाचे कारण होय।।१०।। हा पाचवा पराभव आम्हास समजला, भगवान सहावे पराभवाचे कारण कोणते हे सांगा ।।११।। पुष्कळ संपत्ती, धन आणि अन्न असलेला मनुष्य गोड गोड एकटाच खातो हे त्याच्या पराभवाचे कारण होय।।१२।। हा सहावा पराभव आम्हास समजला, भगवान सातवे पराभवाचे कारण कोणते हे सांगा ।।१३।। जाती, धन आणि गोत्र यांचा गर्व बाळगणारा जो पुरूष आपल्या आप्तांची अवहेलना करतो हे त्याच्या पराभवाचे कारण होय।। १४।। हा सातवा पराभव आम्हास समजला, भगवान आठवे पराभवाचे कारण कोणते हे सांगा ।।१५।। स्त्री, सुरा आणि जुगार या व्यसनात जो मिळालेली संपत्ती पुन्हा पुन्हा चालवितो हे त्याच्या पराभवाचे कारण होय।।१६।। हा आठवा पराभव आम्हास समजला, भगवान नववे पराभवाचे कारण कोणते हे सांगा ।।१७।। स्वस्त्रीशी संतुष्ट न होता जो वेश्यांशी आणि परस्त्रियांशी संबंध ठेवतो हे त्याच्या पराभवाचे कारण होय।।१८।। हा नववा पराभव आम्हास समजला, भगवान दहावे पराभवाचे कारण कोणते हे सांगा ।।१९।। वयस्कर असूनही तरूण स्त्रीशी लग्न करतो व तिच्या इर्षेने शांत झोप घेत नाही हे त्याच्या पराभवाचे कारण होय।।२०।। हा दहावा पराभव आम्हास समजला, भगवान अकरावे पराभवाचे कारण कोणते हे सांगा ।।२१।। दुर्व्यसनी आणि उधळ्या स्त्रीला किंवा तश्याच पुरूषाला जो अधिकाऱ्याच्या जागेवर नेमतो हे त्याच्या पराभवाचे कारण होय।।२२।। हा अकरावा पराभव आम्हास समजला, भगवान बारावे पराभवाचे कारण कोणते ते सांगा ।।२३।। क्षत्रिय कुळात जन्मलेला गरीब मनुष्य मोठी

हाव धरतो व राज्य मिळवू पाहतो हे त्याच्या पराभवाचे कारण होय।।२४।। शहाणा तत्त्वज्ञान संपन्न आर्य हे पराभव जाणून कल्याणप्रद पदाला जातो।।२५।।

## धम्मध्वज वंदना (पाली)

वजिर संघात कायस्स अङ्गीरस्स तादिनो।
केश मस्सु ही अक्खिनं निलट्ठाने हि रस्सियो।।
निल्लवण्णा निच्छरन्ति अनंत काल भूदके।।१।।
वजिर संघात कायस्स अङ्गीरस्स तादिनो।
छबी तो चेब्ब अक्खिनं पितट्ठाने हि रस्सियो।।
पितवण्णा निच्छरन्ति अनंत काल भूदके।।२।।
वजिर संघात कायस्स अङ्गीरस्स तादिनो।
मस्सलोहित अक्खिनं, रत्तट्ठाने हि रस्सियो।।
रत्तवण्णा निच्छरन्ति अनंत काल भूदके।।३।।
वजिर संघात कायस्स अङ्गीरस्स तादिनो।
अट्ठदन्ते हि अक्खिनं सेतट्ठाने हि रस्सियो।।
सेतवण्णा निच्छरन्ति अनंत काल भूदके।।४।।
वजिर संघात कायस्स अङ्गीरस्स तादिनो।
तेसं तेसं शरीरत्नं नानाट्ठाने हि रस्सियो।।
प्रभस्सरा निच्छरन्ति अनंत काल भूदके।।५।।
वजिर संघात कायस्स अङ्गीरस्स तादिनो।
एवं सब्बनं रस्सिहि निच्छरन्ति दिसो दिसं।
अनंत अथो उद्ध च अम तवं मनोहरं।
काया वाचा चित्तेन अङ्गीरस्स नामामहं।।६।।

## धम्मध्वज वंदना (मराठी)

वज्रासारख्या अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धाच्या डोक्यावरील व दाढीतील केसातून आणि डोळ्याच्या नील स्थानातून प्रभावित होणारा नीळा रंग समुद्र, धरणी व आकाशात व्यापून राहिला आहे।।१।। वज्रासारख्या अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धाच्या पिवळसर त्वचेतून व डोळ्यातील पिवळ्या स्थानातून प्रभावित होणारा पिवळा रंग

समुद्र धरणी व आकाशात व्यापून राहिला आहे।।२।। वज्रासारख्या अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धाच्या मांसातील व डोळ्यातील रक्तवर्ण स्थानातील आणि रक्तातून प्रभावित होणारा लाल रंग समुद्र धरणी व आकाशात व्यापून राहिला आहे।।३।। वज्रासारख्या अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धाच्या दातातून, अस्थितून व डोळ्यातील पांढऱ्या बुबुळांतून प्रभावित होणारा शुभ्र रंग समुद्र, धरणी व आकाशात व्यापून राहिला आहे।।४।। वज्रासारख्या अभेद्य देह धारण करणाऱ्या भगवान बुद्धाच्या निरनिराळ्या अवयवांतून प्रभावित होणारा तपकिरी किंवा बदामी रंग समुद्र, धरणी व आकाशात व्यापून राहिला आहे।।५।। वज्रासारख्या अभेद्य आणि वरीलसह रंगांनी परिपूर्ण असलेल्या अनंतात व दाहिदिशांत अमृताप्रमाणे संतोष देणाऱ्या भगवान बुद्धाच्या धम्मध्वजाला मी कायेने आणि मनाने वंदन करतो।।६।।

## नरसिंह गाथा (पाली)

चक्कवरङ्कित रत्तसुपादो, लक्खण मण्डित आयतपण्ही चामर छत्त विभूसित पादो, एस हि तुय्ह पिता नरसीहो।।१।।
साक्यकुमार वरो सुखमालो, लक्खणचित्तित पुण्यसरीरो,
लोकहिताय गतो नरवीरो, एस हि तुय्ह पिता नरसीहो।।२।।
पुण्णससङ्ग निभुमुखवण्णो, देवनरोना पियो नरनागो,
मत्तगजिन्द विलासितगामि, एस हि तुय्ह पिता नरसीहो।।३।।
रवत्तियसम्भव अग्गकुलीनो, देवमनुस्स नमास्सित पादो।
सीलसमाधि पतिष्ठितचित्तो, एस हि तुय्ह पिता नरसीहो।।४।।
आयतयुत्तङ्ग सुसंठीतानासो, गोपमुखो अभिनील सुनेतो।
इन्द्रधनु अभिनील भमूको, एस हि तुय्ह पिता नरसीहो।।५।।
वट्ट सुवट्ट सुसंठीत गीवो, सीहंहनु मिगराज सरीरो,
कञ्जनसुच्छवि उत्कमवण्णो, एस हि तुय्ह पिता नरसीहो।।६।।
सिनिद्ध सुगंभीर मञ्जुसुधोसो, हिंङगलबद्ध सुरतसुजिव्हो।
वीसती वीसती सेतुसुदन्तो, एस हि तुय्ह पिता नरसीहो।।७।।
अञ्जनवण्ण सुनील सुकेसो कञ्पनट्ट विसुद्ध ललाटो।
ओसधि पण्डर सुद्धसुवण्णो, एस हि तुय्ह पिता नरसीहो।।८।।
गच्छति नील पथे विय चन्दो, तारागण परिवेट्ठित रूपो।
सावकमज्झ गतो समणिन्दो, एस हि तुय्ह पिता नरसीहो।।९।।

## नरसिंह गाथा (मराठी)

ज्यांचे चरण रक्त वर्ण चक्राने अलंकृत आहेत, ज्यांच्या पावलांच्या टाचा सुंदर आहेत. ज्यांचे पावलं चामर- छत्राने सुशोभित आहेत. ते जे नरात सिंह आहेत, तेच तुझे पिता आहेत।।१।। ते जे सुकुमार शाक्य कुमार आहेत जे सुंदर चिन्हांनी परिपूर्ण संपूर्ण शरीर संपन्न आहेत. ज्याने लोकांच्या हितासाठी गृह त्याग केला ते जे नरात सिंह आहेत, तेच तुझे पिता आहेत।।२।। ज्यांचे मुखमंडळ पूर्ण चंद्राप्रमाणे प्रकाशमान आहे. देव मनुष्य व नाग गणांना प्रिय आहे. ते जे मस्त गजेंद्र प्रमाणे जात आहेत. नरात सिंह आहेत, तेच तुझे पिता आहेत ।।३।। ते जे सर्वश्रेष्ठ क्षत्रिय कुळात जन्म पावले असून ज्यांच्या चरणांची देव व मनुष्य वंदना करतात, ज्यांचे चित्त शील समाधीने सुप्रतिष्ठित झाले आहे. ते जे नरात सिंह आहेत, तेच तुझे पिता आहेत।।४।। ज्यांची नासिका विस्तीर्ण आणि सरळ आहे. ज्यांचे नेत्र नील वर्णाचे आहेत, ज्यांच्या भुवया इंद्रधनुष्याच्या कमानीप्रमाणे आहेत. ते जे नरात सिंह आहेत, तेच तुझे पिता आहेत।।५।। ज्यांची ग्रीवा गोलाकार आहे. ज्यांची हनुवटी मृगजळाप्रमाणे आहे. ज्यांच्या वर्ण सुवर्णाप्रमाणे आकर्षक आहे. ते जे नरात सिंह आहेत, तेच तुझे पिता आहेत।।६।। ज्यांची वाणी स्निग्ध आहे, गंभीर आहे, सुंदर आहे. ज्यांची जिव्हा सेंदुराप्रमाणे रक्तवर्णाची आहे. ज्यांच्या मुखात श्वेत वर्णांचे वीस-वीस असे चवाळीस दात आहेत ते जे नरात सिंह आहेत, ज्यांचे ललाट कांचनाप्रमाणे तेजायामान आहे. ज्यांची काया औषधी ताऱ्याप्रमाणे शुभ्र सुशोभित आहे. ते जे नरात सिंह आहेत, तेच तुझे पिता आहेत।।८।। तारांगणात, चन्द्रासमान, भिक्षुगणात शोभून दिसणारे, आपल्या श्रावका समावेत जात आहेत, ते जे नरात सिंह आहेत, तेच तुझे पिता आहेत।।९।।

## जयमङगल अट्ठगाथा (पाली)

बाहुं सहस्समभिनिम्मित सावुधन्तं,
गिरीमेखलं उदित-घोर-ससेन-मारं।
दानादि धम्मविधिना जितवा मुनिन्दो,
तं तेजसा भवतु ते जयमङगलानि।।१।।

मारातिरेक-मभियुज्झित सब्बरत्ति,
घोरम्पनालवक मक्खमथद्ध-वक्खं।
खन्ती सुदन्तविधिना जितवा मुनिन्दो,

तं तेजसा भवतु ते जयमङ्गलानि।।२।।
नालागिरी गजवरं अतिमत्तभूतं,
दावाग्गि चक्कमसनीव सुदारूणन्तं।
मेत्तम्बुसेक विधिना जितवा मुनिन्दो,
तं तेजसा भवतु ते जयमङ्गलानि।।३।।
उक्खित्त खग्गमतिहत्थ सुदारूणन्तं,
धावन्ति योजनपथङ्गुलि-मालवन्तं।
इद्धीभिसङ्गखत मनो जितवा मुनिन्दो,
तं तेजसा भवतु ते जयमङ्गलानि।।४।।
कत्वान कट्ठमुदरं इव गब्भिनिया,
चिञ्चाय दुट्ठवचनं जनकाय मज्झे,
सन्तेन सोम विधिना जितवा मिनिन्दो,
तं तेजसा भवतु ते जयमङ्गलानि।।५।।
सच्च विहाय-मतिसच्चक वादकेतुं,
वादभिरोपितमनं अतिअन्धभूतं।
पञ्ञापदीपजलितो जितवा मुनिन्दो,
तं तेजसा भवतु ते जयमङ्गलानि।।६।।
नन्दोपनन्द-भुजंग विवुचं महिद्धिं,
पुत्तेन थेर भुजगेन दमापयन्तो।
इद्धूपदेस विधिना जितवा मुनिन्दो,
तं तेजसा भवतु ते जयमङ्गलानि।।७।।
दुग्गाहदिट्ठि भुजगेन सुदट्ठ हत्थं,
ब्रह्मंविसुद्धि जुतिमिद्धि बकाभिधान।
ञाणागदेन विधिना जितवा मुनिन्दो,
तं तेजसा भवतु ते जयमङ्गलानि।।८।।
एतापि बुद्ध जयमङ्गल अट्ठगाथा,
यो वाचको दिनदिने सरते मतन्दि।
हित्वाननेक विविधानिं चुपद्दवानि,
मोक्खं सुखं अभिगम्मेय नरोसपञ्ञो।।९।।

## जयमङ्गल अट्ठगाथा (मराठी)

ज्या मुनिन्दाने, (बुद्धाने) सदृढ हत्यार धारण केलेल्या, सहस्त्रबाहु गिरी मेखला हत्तीवर आरूढ झालेल्या, अत्यंत भयानक सेनेसह असलेल्या माराला आपल्या दान आदि धर्मबलाने जिंकले त्या बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।१।। ज्या मुनिन्दाने, माराशिवाय समस्त रात्र संग्राम करणाऱ्या घोर दुर्धर आणि निष्ठूर-हृदय आवलक नामक यक्षाला शान्ति आणि संयम बलाने जिंकले त्या भगवान बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।२।। ज्या मुनिन्दाने, दावाग्निचक्र आणि वीजेप्रमाणे अत्यंत भयानक आणि मदोन्मत अशा नालागिरी हत्तीला आपल्या मैत्रीरूपी पावसाने जिंकले त्या भगवान बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।३।। ज्या मुनिन्दाने, हातात तलवार घेऊन एक योजनेपर्यंत धावणाऱ्या अत्यंत भयानक अंगुलिमालाला आपल्या ऋषी बलाने जिंकले, त्या भगवान बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।४।। ज्या मुनिन्दाने, पोटावर काष्ट बांधून गर्भवतीसारखे आपले पोट मोठे केले त्या चिंचा नामक स्त्रीला (जी बुद्धाला कलंक लावू पाहत होती) आपल्या शांत आणि सौम्य बलाने जिंकले, त्या भगवान बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।५।। ज्या मुनिन्दाने, सत्य सोडलेल्या व असत्य वादाचा पोषक, अभिमानी, वादविवादात परायण व अहंकाराने अन्ध झालेल्या सच्चक परिव्राजकाला प्रज्ञा-दिपाने जिंकले, त्या भगवान बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।६।। ज्या मुनिन्दाने विविध महाऋद्धि संपन्न नंदोपनंद नामक भुजंगाला आपल्या महामौद्गल्यायन शिष्याकडून ऋद्धि, शक्ती आणि उपदेशाच्या बलाने जिंकले, त्या भगवान बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।७।। ज्या मुनिन्दाने भयंकर मिथ्थादृष्टिरूपी सापाने डसलेल्या विशुद्ध ज्योति आणि ऋद्धि शक्ति संपन्न बक नामक ब्रम्हज्ञान्याला ज्ञानरूपी औषध देऊन जिंकले, त्या भगवान बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।८।। जो कोणी पाठक ह्या बुद्धाच्या आठ मंगल गाथा दक्षतापूर्वक दररोज म्हणेल, तो बुद्धिमान पुरूष नाना प्रकारच्या उपद्रवापासून मुक्त होऊन सुख प्राप्त करील।।९।।

## प्रतिज्ञा

अट्ठ गुणो सचित्तं। बुद्ध गुणो अनंतो।
धम्म गुणो अनंतो। संघ गुणो अनंतो।
माता पिता गुणो अनंतो। आचार्य गुणो अनंतो।

## आशीर्वाद (पाली)

भवतु सब्ब मङ्गलं रक्खन्तु सब्ब देवता।।
सब्ब बुद्धानुभावेन सदा सोत्थि भवन्तु ते।।१।।
भवतु सब्ब मङ्गलं रक्खन्तु सब्ब देवता।।
सब्ब धम्मानुभावेन सदा सोत्थि भवन्तु ते।।२।।
भवतु सब्ब मङ्गलं रक्खन्तु सब्ब देवता।।
सब्ब संघानुभावेन सदा सोत्थि भवन्तु ते।।३।।
इच्छितं पत्थितं तुय्हं खिप्पमेवसमिज्झतू।।
सब्बे पुरेन्तु चित्तसंकप्पा चन्दोपन्नरसो यथा।।४।।
आयुरारोग्य सम्पती सब्ब सम्पती मेवच।।
ततो निब्बाण सम्पति इमिना ते सम्पिज्झतू।।५।।
साधूऽ साधूऽ साधूऽ

## आशिर्वाद (मराठी)

तुझे सर्व मंगल होवो, सर्व देवता तुझे रक्षण करोत, बुद्धाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।१।। तुझे सर्व मंगल होवो, सर्व देवता तुझे रक्षण करोत, धम्माच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।२।। तुझे सर्व मंगल होवो, सर्व देवता तुझे रक्षण करोत, संघाच्या प्रतापाने तुझे कल्याण होवो।।३।। तुमच्या इच्छित आणि प्रार्थित सर्व वस्तू तुम्हाला शीघ्र मिळोत. तुमचे सर्व संकल्प पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे पूर्व होवोत।।४।। तुम्हाला दिर्घायुष्य, आरोग्य, सर्व संपत्तीचा लाभ होवो, त्याचप्रमाणे निर्वाण समृद्धी प्राप्त होवो।।५।।

साधूऽ साधूऽ साधूऽ

## सरणत्तय (पाली)

नत्थि मे सरणं अञ्ञं, बुद्धो मे सरणं वरं।
एतेन सच्चवज्जेन, हो तु मे जयमङ्गलं।।
नत्थि मे सरणं अञ्ञं, धम्मो मे सरणं वरं।
एतेन सच्चवज्जेन, हो तु मे जयमङ्गलं।।
नत्थि मे सरणं अञ्ञं, संघो मे सरणं वरं।

एतेन सच्चवज्जेन, हो तु मे जयमङ्गलं।।
साधूऽ साधूऽ साधूऽ

## सरणत्तय (मराठी)

भगवान बुद्धाशिवाय अनुसरण्यास दुसरे उत्तम कोणी नाही, म्हणून मी भगवान बुद्धाला अनुसरतो, ह्या सत्य वचनाने माझे कल्याण होवो. धम्माशिवाय अनुसरण्यास दुसरे उत्तम काही नाही, म्हणून मी धम्माला अनुसरतो, ह्या सत्य वचनाने माझे कल्याण होवो. संघाशिवाय अनुसरण्यास दुसरे उत्तम काही नाही, म्हणून मी संघाला अनुसरतो, ह्या सत्य वचनाने माझे कल्याण होवो.

साधूऽ साधूऽ साधूऽ

## प्रतिज्ञा (पाली)

अत्थेच, धम्मेच, कामेच, नातिचरामि।।१।।
अत्थेच, धम्मेच, कामेच, नातिचरामि।।२।।
अत्थेच, धम्मेच, कामेच, नातिचरामि।।३।।

## प्रतिज्ञा (मराठी)

आम्ही भगवान बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना साक्ष ठेवून, उपस्थित जनसमुदाय व बौद्धाचार्य यांच्या समोर अशी प्रतिज्ञा करतो की, धार्मिक, सामाजिक व वैवाहिक जीवन यांच्या नितीनियमांचे कधीही उल्लंघन करणार नाही. आम्ही एकमेकांचा पती-पत्नी म्हणून स्विकार करतो हे समस्त जनतेस जाहीर असावे.

## पतीची (वराची) कर्तव्ये

## पाली/ मराठी

१) सन्माननायः मी माझ्या पत्नीचा सन्मान करीन.

२) अवमाननायः मी माझ्या पत्नीचा अवमान करणार नाही.

३) अनितिचरीनायायः मी अनिती व अनाचारापासून अलिप्त राहिन.

४) इस्सरिय वोस्सगेनः मी माझ्या पत्नीला अन्नधान्याने संतुष्ट ठेवीन.

५) अलंकारानुपदानेचः मी माझ्या पत्नीला अलंकारादिभूषणांनी संतुष्ट ठेवीन.

## पत्नीची (वधूची) कर्तव्ये

## पाली/ मराठी

१) सुसंविवाहिता कम्मन्ताच होतिः मी माझ्या घरातील सर्व मंडळींची उत्तम व्यवस्था ठेवीन.

२) संघहित परिजनाचः मी माझ्या परिवाराशी सौजन्याने वागेन.

३) अनितीचारनीचः मी अनिती व अनाचारापासून अलिप्त राहीन.

४) सब्भतं अनुरक्खातिः मी माझ्या पतीच्या संपत्तीचे रक्षण करीन.

५) दक्खाच होति अनलसा सब्बकिच्चेसुः मी घरकामात आळस न करता दक्ष राहीन.

## पत्तीदान (पाली)

इदंनो ञातीनं होतु, सुखिया होन्तु ञायतो। (त्रिवार)
उन्नमे उदकं वट्ट यथा निन्नं पवत्तति।
एवमेव इत्तो दिन्नं पेतानं उपकप्पति।।१।।
यथा वारिवहा पूरा, परीपुरेन्ति सागरं।
एवमेव इत्तो दिन्नं पेतानं उपकप्पति।।२।।
इच्छितं पत्थितं तुय्हं खिप्पमेव समिज्झतु।
सब्बे पुरेन्तु चित्तसंकप्पा चन्दो पन्नरस्सो यथा।।३।।
आयुरारोग्य सम्पति, सब्बसम्पतिमेवच।
ततो निब्बाण सम्पत्ति, इमीना ते समिज्झतु।।४।।
अनिच्चा वत सङ्खारा उप्पादवय-धम्मिनो
उप्पजित्वा निरूज्झन्ति तेसं वूपसमो सुखो
कालकतानं अम्हाकं ञातीन पुञ्ञतथा इमं
भिक्खं भिक्खु संघस्स देमं।।५।।

## पत्तीदान (मराठी)

आमच्या या दानाचे पुण्य आमच्या परिजनास प्राप्त होवो व ते सुखी होवोत. जसे उंच जागेवर पडलेले पावसाचे पाणी सखल भूमीकडे वाहत जाते।।१।। तसेच हे पुण्य फळ आमच्या पितरांस प्राप्त होवो. जसे भरलेल्या नदीचे पाणी समुद्रास मिळते, तसेच हे पुण्य फळ आमच्या पितरांस प्राप्त होवो।।२।। तुमच्या इच्छित आणि प्रार्थित सर्व वस्तू तुम्हाला शीघ्र मिळोत, तुमच्या चित्ताचे सर्व संकल्प पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे पूर्ण होवोत।।३।। तुम्हाला दिर्घायुष्य, आरोग्य, सर्व संपत्तीचा लाभ होवो, त्याचप्रमाणे निर्वाण समृद्धी प्राप्त होवो।।४।। सर्वच संस्कार अनित्य आहेत, उत्पन्न होऊन विनाश पावणे हा त्यांचा स्वभावधर्म आहे या परिवर्तनशील संस्कारातूम मुक्त होणे हेच परम सुख (निर्वाण) आहे. हे भन्ते! मृत पावलेल्या आमच्या जाती बांधवांच्या पुण्याकरिता परिष्कार पूर्ण ही भिक्षा आम्ही भिक्षु-संघास देत आहोत, याचा आपण स्विकार करावा।।५।।

## भगवान बुद्धमुर्ती खालील मुद्रांत आहेत

(१) विशाल मुद्रा (२) पद्मासन मुद्रा (३) धम्मचक्क प्रवर्तन मुद्रा (४) भूमि स्पर्श मुद्रा (५) ध्यान मुद्रा (६) अभय मुद्रा (७) पिण्डपात मुद्रा (८) अंजली मुद्रा (९) उकल (प्रतित्य समुद पाद) मुद्रा (१०) निर्वाण मुद्रा

## महामानव भगवान बुद्धांची ३२ लक्षणे

भगवान बुद्ध महापुरूषांच्या ३२ लक्षणांनी युक्त होते. ती बत्तीस लक्षणे अशी –

१) सुप्रतिष्ठित पाद - ज्याचे पाय जमिनीवर बरोबर बसतात.

२) ज्याच्या तळपायाचे सर्व आकार परिपूर्ण, बेंबी मासलयुक्त व सहस्त्र आर (spokes) असलेले चक्र असलेली

३) आयतपार्ष्णी - रूंद घोटे असणारा

४) लांब बोटे (अंगुली) - लांब सडसडीत बोटे

५) मृदू तरूण हस्तपाद - मऊ, देखणे हातपाय
६) जाल-हस्त-पाद - बोटे एकमेकांशी समांतर जुळणारी
७) उस्संखपाद - पायाच्या वरच्या भागावर गुल्फ असणे
८) एडी-जंघ - हरिणासारखे राय असणे
९) आजानुबाहू - न झुकता उभे राहिले असता गुडघ्याला हाताचे तळवे स्पर्श करणारे.
१०) कोषाच्छादित - परूष - इंद्रिय
११) सुवर्ण वर्ण - सुवर्णासारखी कांती (त्वचेचे तेज)
१२) सूक्ष्म - छबी - नितळ त्वचा - जिच्यावर धूळ चिटकत नाही.
१३) एकैक लोम - त्वचेच्या प्रत्येक छिद्रात एक रोम (केस)
१४) उर्ध्वाग्र लोम - प्रदक्षिणासारखे (डावीकडून उजवीकडे) गोलाकार केसांचे टोक वरच्या बाजूला असलेले
१५) ब्रम्ह जू - गात्र - लांब सडपातळ शरीर (उंच सडपातळ बांधा)
१६) सप्त - उत्सद - शरीराचे सातही अंग पूर्ण आकारसहीत
१७) सिंह - पूर्वाध काया - कंबरेच्या वरील छाती आदीचा भाग सिंहाप्रमाणे विशाल (रूंद छाती)
१८) चिंतान्तरांस - दोन्ही खांद्याच्या मधील भाग चितपूर्ण असतो
१९) न्यग्रोध - परिमंडळ - जितकी शरीराची उंची आणि तितकीच शरीराची रूंदी (दोन्ही हात पसरून)
२०) समवर्त - स्कंध - समान आकार असलेले खांदे असणारा
२१) रसग्ग - सग्गो - सुंदर शिरा (रक्तवाहिन्या) असणारा
२२) सिंह - हनु - सिंहासारखी हनुवटी असलेला
२३) चव्वालिस दन्त - ४४ दात असलेला
२४) समदन्त - एकसारख्या आकाराचे, पक्तीबद्ध दात असलेला
२५) अ - विवर - दन्त - दातांमध्ये फट नसलेला, एकमेकांना लागून दात असलेला
२६) सु - शुक्ल-दाढ - पांढरे शुभ्र दात व दाढ असलेला (शुभ्र दंतपंक्तिवाला )
२७) प्रभूत - जिव्हा - लांब जीभ असलेला
२८) ब्रम्ह - स्वर - करविंक पक्षाच्या स्वरासारखा स्वर असणारा (मधूर स्वरवाला)
२९) अभिनील नेत्र - अलसीच्या फुलाप्रमाणे नीलवर्ण नेत्र असलेला (कजरारी आँखे)
३०) गो - पक्ष्म - गायीसारख्या काजलयुक्त लांब व दाट केस असलेल्या पापण्या असलेला
३१) भोंहो के बीच में श्वेत कोमल कपास - सी उर्णा - दोन भुवयांमध्ये कापसासारखी मऊ व शुभ्र केसांची दाट ओळ

३२) उष्णीषशीर्षा - डोक्याच्या मध्यभागावरील भाग पगडीसारखा उंचवटा असलेला. ह्याशिवाय त्यांच्या चारही बाजूला एक व्यामभर प्रकाश पसरलेला राहत असे. त्यालाच तेजोवलय म्हटले आहे.

## बौद्ध धम्म असलेली जगातील काही राष्ट्रे

१) भारत २) सिलोन ३) ब्रम्हदेश ४) थायलंड ५) जपान ६) नेपाळ ७) चीन ८) कंबोडिया ९) इंडोनेशिया १०) व्हिएतनामा ११) भुतान १२) दक्षिण/उत्तर कोरीया १३) लडाख १४) तिबेट १५) लाओस १६) अमेरिका १७) इंग्लंड १८) पूर्व जर्मनी १९) तैवान २०) रशिया २१) पश्चिम जर्मनी २२) अफगाणिस्थान २३) मलेशिया २४) बांग्लादेश २५) युगोस्लाव्हिया २६) श्रीलंका २७) ऑस्ट्रेलिया २८) न्युझिलंड २९) स्वीडन ३०) हॉलंड ३१) तुर्कस्थान ३२) सौदी अरेबिया ३३) इराक ३४) फ्राँस ३५) मंगोलिया ३६) ग्रीस ३७) ब्रिटन ३८) स्पेन ३९) फुनान ४०) पाकिस्तान ४१) नॉर्वे ४२) इटली ४३) स्वित्सर्लंड ४४) कॅनडा ४५) सिंगापूर ४६) जावा ४७) सुमात्रा ४८) बानिओ ४९) मालदिप ५०) वेदरलँड ५१) कोकोद्वीप ५२) पॅरिस बेट ५३) कंपुजिया ५४) लक्षद्विप ५५) बलिद्वीप ५६) फिलीपिन्स ५७) सेलिबीन ५८) येमेन ५९) बर्मा ६०) बाली ६१) हिन्दचीन ६२) मलया ६३) उत्तर युनान ६४)गान्धार

## महाराष्ट्रातील बौद्ध लेण्या

१) मुंबई जिल्हा : एलिफंटा, कोंडविते
२) ठाणे जिल्हा : इंद्रगड, विरार, कान्हेरी, पुलू-सोनाला
३) पुणे जिल्हा : अयारा, बेडसा, भाजा, इन्दूरी, जिवधन, जुन्नर, कार्ले, कोटालीगड, लोहगड, नानेघाट, नानेली, पाले, पणे, सेलेटना, शेलारवाडी, शिंदेवाडी, शिंदे, वालक
४) कुलाबा जिल्हा : अंबिबीले, चौल, ढाक, गौरकामथ, गोमाशी, गोरखगड, हलखुर्द, करसांबळे, थनाले, कोल, कोंडाने, कुडा, महाड, नादसूर, रामधरण, उरण.
५) नाशिक जिल्हा : चांभारलेणी, नाशिक, खेड.
६) सारा-सांगली जिल्हा : बावधन, कऱ्हाडलोहारे, पांडवगड, पाटण, शिरवळ
७) रत्नागिरी जिल्हा : चिपळूण, दाभोड, खेड
८) कोल्हापूर जिल्हा : पावला, पांडवदरा
९) औरंगाबाद जिल्हा : अजिंठा, पितळखोरा, वेरूळ, घटोत्कच.

## नित्यपाठ

आपल्या घरात दररोज सकाळी किंवा सायंकाळी सोयीच्या वेळी १५ मिनिटे ते ४५ मिनिटांपर्यंत आनापानसती किंवा मैत्रीभावना यांचा सराव केला पाहिजे. त्यावेळी त्रिशरण-पंचशिल, त्रिरत्न वंदना, बुद्धपूजा व जयमंगल अट्ठगाथा म्हणावी. वेळ असल्यास पुढे महामङलसुत्त, रतनसुत्त आणि करणीमेत्तसुत्त यासारख्या सुत्तांचे पठण करावे. अर्थात जेवढा वेळ आपणास मिळत असेल तेवढे तरी सुत्त पठण करावे. फारच वेळ मिळत असेल तर १०-१५ मिनिटे ध्यान साधना करावी अथवा भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म यासारख्या धम्मग्रंथातील काही भागांचे वाचन करावे. शेवटी बुद्धं नमामि, धम्मं नमामि आणि संघं नमामि एवढे तरी कमीत कमी म्हणावे.

## धम्म

दिशाहीन जिवनाचा मार्गदर्शक म्हणजेच धम्म
माणसातील माणुसकी आणि प्रेम म्हणजेच धम्म
समाजातील स्वाभिमानाचा श्वास म्हणजेच धम्म
देशाभिमाचे सळसळते रक्त म्हणजेच धम्म
अखिल मानवजातीचे कल्याण म्हणजेच धम्म
जीवनात पूर्णता साधणे म्हणजेच धम्म
प्रज्ञा आणि करूणेचे अपूर्व मिश्रण म्हणजेच भगवान बुद्धांचा धम्म

**पाली भाषेतल्या ग्रंथात असे म्हटले आहे:**

**दिवा तपति आदिच्चो**
**रत्तिं आभाति चन्दिमा**
**सन्नद्धो खत्तियो तपति**
**झायी तपति ब्राम्हणो**
**अथ सब्बं अहोरत्तिं**
**बुद्धो तपति तेजसा**

"सूर्य केवळ दिवसाच प्रकाशतो आणि चंद्र केवळ रात्रीलाच प्रकाशमान करतो. आपली शस्त्रास्त्रे धारण केल्यावर क्षत्रिय तेजस्वी दिसतो. जेव्हा ध्यानस्थ असतो तेव्हाच ब्राम्हण तेजपुंज दिसतो. पण बुद्ध मात्र स्वयंतेजाने दिवस-रात्र सतत प्रकाशित राहतो."

## भगवान बुद्ध आणि त्यांच्या धम्माबद्दल जगातील काही मान्यवरांचे गौरोद्‌गार

"भगवान आपला देह निर्दोष आहे, परिपूर्ण आहे, आकर्षक आहे, सुवर्णवर्णी आहे. आपले दात चमकदार आहेत. महापुरूषांच्या ठायी असणारे प्रत्येक लक्षण ह्या सुविकसित देहात प्रतीत होत आहे." - साल नामक ब्राम्हण

"मी बालपणापासूनच बौद्ध धर्माने प्रभावित झालो आहे. बौद्धधर्म हा असा धर्म आहे जो तीन सिद्धांतांची दिक्षा देतो; प्रज्ञा, करूणा आणि समता. बौद्धधर्मच जगातील शोषण थांबवू शकतो. माझा असा विश्वास आहे की, एक दिवस मानवतेच्या रक्षणासाठी केवळ भारतच नव्हे तर सारं जग बौद्ध धर्माचा स्विकार करेल."

- बोधिसत्व डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

भगवान बुद्धांच्या जन्मापूर्वीचा काळ हा भारतीय इतिहासातील तमोयुगांपैकी एक होता. आत्मत्याग किंवा संकल्पाची पवित्रता ह्यांसारख्या खऱ्या नैतिक विचारांना तत्कालीन नैतिक अभिज्ञतेत यथायोग्य स्थान नव्हते. - प्रा. एस. एस. राघवाचार

भगवान बुद्धांच्या शिकवणीचे अपूर्व स्वरूप भारतीय धार्मिक विचारधारांच्या अध्ययनात प्रतित होते. - श्री. आर. के. जॅकसन

भगवान बुद्धांचा धम्म किती तरी निराळा आहे. - श्री. रीड

भगवान बुद्धांचा अनित्यतेचा सिद्धांत खरा ठरला आहे. - डॉ. रंजन रॉय

बौद्धधम्म हीच जगातील सर्वप्रथम नैतिक विचारपद्धती आहे की, जिच्यामध्ये मानवास आत्मनियमन करण्याची शिकवण दिलेली आहे. - श्री. इ. जी. टेलर

बौद्धधम्माचे आध्यात्मिक तत्वज्ञान हीच फार सामर्थ्यशाली देणगी आहे. - रेव्हरण्ड लेस्ली बोल्टन

मानवतेची योग्यता उंचविण्यात कर्तृत्वान जर खऱ्या थोर माणसाचे मोठेपण सामावले असेल तर खरा असा तथागताशिवाय दुसरा कोणी असू शकेल ? - प्रा. ड्वाइट गोडार्ड

बौद्धधम्माइतका दुसऱ्या कोणत्याही धर्मात ज्ञानाच्या मूल्यावर आणि अज्ञानाच्या हीनतेवर भर देण्यात आलेला नाही. - श्री. ई. जे. मिल्स

भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म श्रेष्ठ आणि अपूर्व आहे. असे भगवान बुद्ध आपले गुरू असावेत असे कोण बरे म्हणणार नाही ? - प्रा. डब्लू. टी. स्टेस

ना शोध कुणाचा उसणा, दु:खाचे कारण तृष्णा। तोड तयावर सांगून गेला महान अंतर्यामी। - महाकवी वामनदादा कर्डक

## महामानव डॉ. भिमराव राजमी आंबेडकर यांच्याबद्दल जगातील काही मान्यवरांचे गौरोद्गार

डॉ. आंबेडकरांसारखा विद्यार्थी आपण जन्मात कधी पाहिला नाही. तो सर्वदा अभ्यासात गुंतलेला असतो. - गुरूवर्य केळूस्कर गुरूजी

इसमें कोई संदेह नहीं है की बौद्ध समाज कि भारत में सातसौ वर्षों के बाद इस ठोस प्रतिष्ठा में सबसे बडा हाथ बाबासाहब का है। इतिहास उन्हे कभी भूला नहीं सकेगा।

- महापंडित राहुल सांस्कृत्यायन

जग बदल घालूनी घाव। सांगून गेले मला भीमराव। - लोकशाहीर अण्णा भाऊ साठे

ते आज देहाने नष्ट झाले असले तरी त्यांची दलितांच्या ह्रदयात कोरलेली मूर्ती नष्ट होणार नाही. - प्रबोधनकार ठाकरे

चांदण्यांची छाया, कापराची काया।माऊलीची माया होता, माझा भीमराया
-महाकवी वामनदादा कर्डक

ज्या ठिकाणी जाण्यास देवदूत देखील बिचकतील, त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अन्याय दिसताच निधड्या छातीने पाय टाकला व त्या ठिकाणचे कार्य पूर्ण तडीच नेले.
- बी. सी. कांबळे

बाबासाहेबांचा स्वभाव जितका मनमिळाऊ आहे तितकाच तो मानी आहे. आपल्या जातीला व आपणाला ज्याच्या योगाने कमीपणा येईल अशी गोष्ट न घडण्याविषयी ते नेहमी दक्षता घेत असत. - बळवंत वराळे

डॉ. आंबेडकरांना तुम्ही मारलेत तर (बाबासाहेब हयात असताना) त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबामधून दहा आंबेडकर बाहेर पडतील. - डॉ. कुर्तकोटी

बाबासाहेब आंबेडकर हा एकच आमचा बाप, ही एकच आमची शक्ती, हे एकच निशाण, एकच आमची जात. - लक्ष्मण माने

बाबासाहेब हे हिमालयासारखे महान असून असा बुद्धिमान आणि कर्तबगार पुरूष आजपर्यंत जन्मला नाही व यापुढे कित्येक शतकांतही जन्मेल असे वाटत नाही. दुर्दैवाची गोष्ट ही की, सूर्यप्रकाशासारख्या स्वच्छ दिसणाऱ्या ह्या पुरूषाचा मोठेपणा न दिसण्याइतकी आंधळी माणसे अजूनही आपल्यात आहेत. - आचार्य अत्रे

डॉ. आंबेडकर हे बुद्धाचे आधुनिक अवतार होते. - मधुकर महाजन

डॉ. आंबेडकर हे एक दणक्ये किंवा लढाऊ वृत्तीचे पुढारी होते. पाणचटपणा किंवा मिळमिळीतपणा त्यांच्यात नाही. - श्री. देवदत्त टिळक

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथसंग्रह

कायदा ५०००, राजकारण ३०००, इतिहास २५००, धर्म २०००, साहित्य १३००, चरित्रे १२००, अर्थशास्त्रे १२००, तत्वज्ञान विषयक ६००, युद्धशास्त्र ३००, इतर ७९०० आणि एकूण २५०००.

## महत्वाच्या गोष्टी

तीन गोष्टींसाठी भांडा : स्वातंत्र्य, इनाम, न्याय!
तीन गोष्टींपासून दूर रहा : संशय, निंदा, व्यभिचार!
तीन गोष्टींसाठी त्याग करा : प्रेम, नम्रता, सदाचार!
तीन गोष्टींसाठी प्राणार्पण करा : देश, धर्म, मित्र!
तीन गोष्टीं नेहमी टाका : आळस, स्तुती, बडबड!
तीन गोष्टी कधी विसरू नका : उपदेश, उदारता, उपकार!
तीन गोष्टींवर मर्यादा राखा : मोह, जीभ, राग!
तीन गोष्टींसाठी तप्तर असा : दुःख, परोपकार, मरण

## बाबासाहेबांची काही महत्वपूर्ण वाक्ये

"शब्दात शहाणपण, विचारात निष्ठा, वर्तनात चारित्र्य, असेल तर भारत महान बनू शकेल."
"जो इतिहास विसरतो, तो इतिहास कधीच घडवू शकत नाही."
"गुलामाला गुलामीची जाणीव करूण द्या म्हणजे तो बंड करेल."
"त्यागाच्या अग्नीदिव्यातून तावून सुलाखून निघाल्याशिवाय माणसाला मोठेपण प्राप्त होत नाही."

## बुद्ध वचन

तुम शेर के सामने जाते समय भयभीत न होना,
यह बहादुरी की परीक्षा है।
तुम तलवार के सामने जाते समय भयभीत न होना,
यह त्याग की कसौटी है।
तुम पर्वत शिखर से पाताल में कुदते हुए भयभीत न होना,
यह तप की कसौटी है।
तुम बढती ज्वालाओंके सामने जाते समय भयभीत न होना,
यह स्वर्ण की परीक्षा है।
लेकीन शराब से सदा भयभीत रहना, क्योंकि
यह बुराई, गरीबी, और दुराचार की जननी है।

———————

THE END

**website : vinimaypublications.com**

वाचकांसाठी सूचना : कृपया ! आपले आप्तेष्ट, नातेवाईक तसेच मित्र-मैत्रिण यांना या वेबसाईट वरील पुस्तकांबद्दल माहिती द्या.